बुधवार, १ डिसेंबर २०२१

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक १३४
www.ramprahar.com

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## ‘कोरोनाच्या नव्या विषाणूचा भारतात एकही रुग्ण नाही’



**नवी दिल्ली :** कोरोनाच्या नव्या विषाणूबाबत जगातील अनेक देशांतील लोक घाबरले असताना केंद्र सरकारने दिलासादायक बातमी दिली आहे. जगातील १४ देशांमध्ये आढळलेल्या ओमायक्रॉन व्हेरिएंटचा भारतात आतापर्यंत एकही रुग्ण नाही, अशी माहिती आरोग्यमंत्री मनसुख मांडविय यांनी मंगळवारी (दि. ३०) राज्यसभेत दिली. केंद्र सरकार संपूर्ण काळजी घेत असून ओमायक्रॉन व्हेरिएंटसंदर्भात आरोग्य मंत्रालयाकडून नियमावली जारी करण्यात आली आहे. परदेशातून आलेल्या कोणत्याही व्यक्तीमध्ये याची लक्षणे आढळून आल्यास त्याची त्वरित चाचणी करण्यात येत आहे. जिनॉम सिक्वन्सिंगचे कामदेखील सुरू आहे, असे प्रश्नोतराच्या सत्रात मंत्री मांडविय यांनी सांगितले.

**अंतरंग**

मांडवा पोलीस ठाण्याचा तटरक्षक दलाकडून सन्मान/२

श्रेय घेण्यावरून राष्ट्रवादी-शेकापमध्ये तू तू मैं मैं!/५

माणगाव प्रीमियर लीगचा आजपासून ‘रन’संग्राम/६

## पनवेल महापालिकेचा ७८३ कोटींचा अर्थसंकल्प मंजूर

# सर्वांगीण विकासावर भर

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेच्या सन २०२१-२२च्या सुमारे ७८३ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाला मंगळवारी (दि. ३०) विशेष सर्वसाधारण सभेत मान्यता देण्यात आली. या अर्थसंकल्पाला स्थायी समितीत मान्यता देणाऱ्या विरोधकांनी महासभेत मात्र सभात्याग केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

पनवेल महापालिकेची विशेष सर्वसाधारण सभा आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या वेळी स्थायी समितीचे सभापती संतोष शेट्टी यांनी महापालिकेचा २०२१-२२चा सुमारे ७८३ कोटींचा अर्थसंकल्प महापौरांना सादर करताना संपूर्ण मराठीत भाषण केले. सुमारे ७८३ कोटी रुपयांच्या वस्तुनिष्ठ अर्थसंकल्पात महापालिका क्षेत्राच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला आहे.

अर्थसंकल्पावर चर्चा करताना स्थायी समितीत त्याला मान्यता देणाऱ्या विरोधी सदस्यांनी मालमत्ता कर व एलबीटीवर उभे राहून गोंधळ घालण्यास सुरुवात केली. महापौरांनी अनेक वेळा सांगूनही त्यांनी खाली बसण्यास नकार दिला व अखेर सभात्याग केला. त्यानंतर सदस्यांनी विकासावर चर्चा करून अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला. विरोधकांनी प्रसिद्धीसाठी आजच्या सभेत अर्थसंकल्पाला विरोध केल्याचा आरोप स्थायी समितीचे माजी सभापती मनोहर म्हात्रे यांनी पत्रकारांशी बोलताना केला.




(छाया : लक्ष्मण ठाकूर)

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

विकासासाठी निधीची आवश्यकता आहे. त्यामुळे कर गोळा करणे आवश्यक आहे. पनवेल शहर चांगले नावारूपाला यावे याकरिता अर्थसंकल्पातील तरतुदीप्रमाणे खर्च होण्यासाठी अधिकारी आणि नगरसेवक जोमाने काम करतील अशी अपेक्षा व्यक्त करतो, असे सभागृह नेते परेश ठाकूर म्हणाले.

### शहरांबरोबरच गावांचाही होणार विकास

शहरी भागाबरोबरच पनवेल महापालिकेमध्ये समाविष्ट २९ गावांचा विकास करण्यासाठी अनेक निर्णय या अर्थसंकल्पात आहेत. सर्व भागांचा विकास साधून संतुलन साधण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. याचबरोबर पालिकेच्या मुख्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करणे, चारही प्रभागांच्या कार्यालयाची बांधकामे करणे, महापौर निवासस्थान बांधणे, सिडकोकडून प्राप्त होणारी उद्याने, दैनिक बाजार, खुल्या जागा यांची विकासकामे हाती घेतली जाणार आहेत.

### विकासाभिमुख अर्थसंकल्प -सभागृह नेते परेश ठाकूर



अर्थसंकल्पाबाबत बोलताना सभागृह नेते परेश ठाकूर म्हणाले की, स्थायी समितीचे सभापती संतोष शेट्टी यांनी विकासाभिमुख अर्थसंकल्प मांडला आहे. पनवेल महापालिकेचा सन २१-२२चा अर्थसंकल्प मांडण्यास कोरोनामुळे उशीर झाला, पण तो मंजूर करणे आवश्यक असते. यामध्ये कराच्या रूपाने २२० कोटी रुपये येतील अशी अपेक्षा आहे. यामधून नागरिकांना आणखी कशी सवलत देता येईल याची आम्ही चाचपणी करीत आहोत, पण जोपर्यंत महापालिकेकडे पैसा येत नाही तोपर्यंत महापालिकेचा विकास करता येणे शक्य नाही. महापालिकेने नेमलेल्या एजन्सीच्या अहवालाप्रमाणे २०२५पर्यंत पाच हजार कोटी व २०३०पर्यंत १० हजार कोटी मिळाले, तर आपण नवी मुंबई महापालिकेच्या दिशेने वाटचाल करू शकतो.

### अर्थसंकल्पाची वैशिष्ट्ये

- **महापालिकेने २०२०-२०२१ मध्ये शहरांमध्ये जे कर व दर लागू केले आहे तेच दर कायम ठेवून कोणत्याही करात किंवा दरात वाढ सूचविलेली नाही.**
- **महिला व बालकल्याण विभागाच्या विविध योजना, मागासवर्गीयांसाठीच्या विविध योजनांसाठीचे निश्चित धोरण आखण्यात आले असून शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे.**
- **दिव्यांगांसाठी पुरेशी तरतूद जमा व खर्चाच्या अंदाजात प्रस्तावित करण्यात आली आहे.**
- **महापालिकेची प्रशासकीय इमारत, स्वराज्य या मुख्यालयाचा विकास, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग आणि पद्मदुर्ग या प्रभाग कार्यालयांच्या विकासासाठी या अर्थसंकल्पात २८ कोटी रुपये इतकी तरतूद करण्यात आली आहे.**

## आजपासून शाळा सुरू करण्यास नकारघंटा!

**अनेक ठिकाणी निर्णय लांबणीवर**




**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील शाळांचे सर्व वर्ग येत्या १ डिसेंबरपासून सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने जाहीर केला आहे. त्यानुसार स्थानिक पातळीवर सर्व तयारीही झाली होती, मात्र ओमायक्रॉन नावाचा कोरोनाचा नवा विषाणू दक्षिण अफ्रिकेत आढळल्यानंतर त्याचा फटका शाळा सुरू करण्याच्या निर्णयालादेखील बसला आहे. स्थानिक पातळीवर शाळा सुरू करण्याचा निर्णय लांबणीवर टाकल्याचे चित्र अनेक महापालिकांमध्ये दिसून येत आहे.

राज्य सरकारने १ डिसेंबरपासून शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला असला तरी स्थानिक पातळीवरील परिस्थिती पाहून निर्णय घेण्याचे अधिकार स्थानिक प्रशासनाला देण्यात आले आहेत. त्यानुसार मुंबई महापालिकेने १ डिसेंबरपासून शाळा सुरू न करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई व पनवेल पालिकेच्या हद्दीतील शाळा १५ डिसेंबरपासून सुरू होतील.

मुंबईप्रमाणेच पुणे महानगरपालिकेनेही १ डिसेंबरपासून शाळा सुरू न करण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भात सविस्तर विचार करून आणि महापालिका क्षेत्रातील पालक संघटनांशी चर्चा करून निर्णय घेऊ, असे पुण्याचे महापौर मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले आहे.

मुंबई-पुण्यापाठोपाठ नाशिक महापालिकेच्या हद्दीतील शाळादेखील १ डिसेंबरला सुरू होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. ओमायक्रॉनचा नवा विषाणू आढळल्याचा शहरात काही परिणाम आहे किंवा नाही हे पाहूनच याबाबतचा निर्णय घेता येईल. त्यामुळे १० डिसेंबरपर्यंत या संदर्भातील निर्णय स्थगित करण्यात आल्याचे नाशिक महापालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

## निवडक

### मराठा आंदोलनातील मृतांच्या वारसांना १० लाख रुपये

**मुंबई :** मराठा आरक्षण आंदोलनात मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसांना प्रत्येकी १० लाख रुपये देण्याचे आश्वासन भाजपच्या नेतृत्वाखालील युती सरकारने दिले होते. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून एकूण ३४ कुटुंबीयांसाठी मदतीची रक्कम संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना वर्ग करण्यात आली आहे.

### देबाशिष चक्रवर्ती राज्याचे नवे मुख्य सचिव

**मुंबई :** राज्याचे मुख्य सचिव सीताराम कुंटे यांचा कार्यकाळ संपला आहे. त्यामुळे या जागी नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव देबाशिष चक्रवर्ती यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कुंटे यांनी मंगळवारी (दि. ३०) चक्रवर्ती यांच्याकडे पदाची सूत्रे सोपवली, तर कुंटे यांची मुख्यमंत्री सचिवालयात प्रधान सल्लागार या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

### अभिनेत्री कंगना रणौतला जीवे मारण्याची धमकी

**मनाली :** बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री कंगना रणौतला जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचे समोर आले आहे. सोशल मीडियातून कंगनाला ही धमकी देण्यात आली आहे. तिने या प्रकरणी पोलिसात तक्रार दाखल केली असून, धमकी देणाऱ्याविरोधात फिर्याद नोंदवली आहे.

## सुनील तटकरे राष्ट्रवादी नव्हे; कुटुंबवादी

**भास्कर जाधव यांचा पलटवार**

**चिपळूण : प्रतिनिधी**

कुणबी समाजाला विधान परिषद द्या हे बोललो, तर सुनील तटकरेंना मिरच्या का झोंबल्या? राष्ट्रवादीचे नाव घेऊन नेहमी कुटुंबवादी राजकारण करून सर्व पदे स्वतःच्या घरात ठेवायची आणि दुसऱ्याच्या राजकीय जीवनाची माती करायची हेच सुनील तटकरे यांचे धोरण राहिले आहे, अशा शब्दांत शिवसेना





आमदार भास्कर जाधव यांनी मंगळवारी (दि. ३०) राष्ट्रवादीचे राष्ट्रीय सरचिटणीस खासदार सुनील तटकरेंवर पत्रकार परिषदेत जोरदार शाब्दिक हल्ला चढवला. अंगावर आलात तर भास्कर जाधव शांत बसणार नाही, असा इशाराही या वेळी जाधव यांनी दिला.

कोकण स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची जागा कुणबी समाजाला देऊन त्यांचा सन्मान करावा, अशी मागणी आमदार भास्कर जाधव यांनी खेड तालुक्यातील पंधरागाव आंबडस येथील शिवसेना मेळाव्यानिमित्ताने केली होती. त्यांच्या या मागणीवर खासदार सुनील तटकरे यांनी उत्तर देताना **(पान २ वर..)**

## नोकरभरती पेपरफुटीचा पर्दाफाश

**पुणे : प्रतिनिधी**

वेगवेगळ्या नोकरभरतीचे पेपर फोडून लाखो रुपयांना विक्री करणारी टोळी कार्यरत असल्याचे समोर आले आहे. आर्मी इंटेलिजन्सने अटक केलेल्या लष्करातील हवालदार अनिल चव्हाणके याच्या ऑडिओ क्लिपमधून या घोटाळ्याचा पर्दाफाश झाला आहे.

३१ ऑक्टोबरला झालेल्या आरोग्य विभागाच्या भरती प्रक्रियेचा पेपर फुटल्याचे उघड झाल्यावर पुणे सायबर सेलकडे अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला. सैन्यभरती घोटाळ्याचा तपास करणाऱ्या आर्मी इंटेलिजन्सला हा पेपर लीक करणाऱ्या टोळीचा आर्मीत हवालदार म्हणून काम करणाऱ्या अनिल चव्हाणके याच्या कॉल रेकॉर्डिंगमधून छडा लागला. मग पिंपरी चिंचवड पोलीस आणि आर्मीने नाशिकहून चव्हाणके, सांगलीहून त्याचा साथीदार प्रवीण पाटील आणि पुण्यातून महेश वैद्यला अटक केली, मात्र आता पिंपरी-चिंचवड पोलीस आरोग्य विभागात घोटाळा झालाच नसल्याचा दावा करीत आहेत. फक्त सैन्यात भरती करून देण्याच्या नावाखाली पैसे उकळणाऱ्या एजंटला अटक केल्याचे त्यांनी म्हटले आहे.

## पनवेल-गोरेगाव लोकल आजपासून

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मध्य रेल्वेच्या हार्बर मार्गावरील पनवेल-अंधेरी ही लोकल बुधवार (दि. १)पासून गोरेगावपर्यंत धावणार आहे. या कामी पनवेल प्रवासी संघाने पाठपुरावा केला होता.

आमदार प्रशांत ठाकूर, प्रवासी संघाचे अध्यक्ष व पनवेल रेल्वेस्थानक सल्लागार समितीचे सदस्य डॉ. भक्तिकुमार दवे आणि झेडआरयूसीसी सदस्य अभिजित पाटील यांच्या हस्ते पनवेल रेल्वेस्थानकात पहिल्या लोकलला हिरवा झेंडा दाखविण्यात येणार आहे. दरम्यान, हार्बर रेल्वेवर सीएसएमटी ते पनवेलदरम्यान एसी लोकलही बुधवारपासून धावणार आहेत.

## राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत ‘आरटीपीएस’चे सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नाशिक येथे नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमधील (आरटीपीएस) विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले आहे.



महाराष्ट्र राज्य आणि नाशिक जिल्हा तलवारबाजी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ऑलिम्पिक मिशन २०२८ अंतर्गत राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेचे आयोजन नाशिकच्या कालिका देवी मंदिर परिसरात प्रथमच करण्यात आले होते.

या स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा विद्यार्थी सोहम जंगम याने सुवर्ण, ओजस उदय पोवारने रौप्य, तर आदित्य संजय माने, निहाल हरीशकुमार सिंग, सिद्धार्थ उदय काकडे, आर्या बाळासाहेब रासकर व जन्नत संदीपकुमार त्रिपाठी यांनी कांस्यपदक जिंकले.

याचबरोबर जालना जिल्हा स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा विद्यार्थी वैभव शिवाजी बोटे याने उज्ज्वल यश संपादन केले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी अभिनंदन व कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.





**पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**

**बुधवार, दि. १ डिसेंबर २०२१ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा-उरण नाका, पनवेल
३. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
१०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
११. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
१२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
१३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
१४. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
१५ न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
१६. सेंट्रल रेल्वे, पनवेल

**कोवॅक्सिन**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
२. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल
३. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

**पनवेल ग्रामीण लसीकरण**

- वळवली रा.जि.प. शाळा
- रोहिंजण रा.जि.प. शाळा
- मुर्बी रा.जि.प. शाळा
- कोयनावेळे रा.जि.प. शाळा
- पाले खुर्द रा.जि.प. शाळा
- पेंधर रा.जि.प. शाळा
- तळोजे मजकूर रा.जि.प. शाळा
- कळंबोली काळभैरव मंदिर सभागृह
- आसुडगाव रा.जि.प. शाळा
- जुई रा.जि.प. शाळा

# राष्ट्रवादीने सगळा शिवसेना पक्ष संपवायचे ठरवलेय -चंद्रकांत पाटील

**सांगली : प्रतिनिधी**

सत्तेमध्ये असलेल्या राष्ट्रवादीने प्रत्येक ठिकाणी शिवसेनेचा पाडाव सुरू केला आहे, असा दावा भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी केला आहे. शिवसेनेने मुख्यमंत्रीपदापायी आपला सगळा पक्ष संपवायचं ठरवलं आहे, अशी टीकाही या वेळी त्यांनी केली. सांगली जिल्हा बँकेच्या निवडणुकीत विजयी झालेल्या भाजप उमेदवारांचा चंद्रकांत पाटलांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी बोलताना त्यांनी शिवसेनेवर टीकास्त्र सोडलं.



तिन्ही नगरपंचायती तुम्ही खूप ताकदीनं लढवा. आपल्याला सगळ्याच निवडणुकीत लक्ष द्यायचं आहे. भाजप क्रमांक एकचा पक्ष होत आहे. आता जिल्हा परिषदेच्या ओबीसी कमिटीच्या आरक्षित केलेल्या पोटनिवडणुका ज्या झाल्या त्याच्यात आपण क्रमांक एकवर आलो. आपल्या २३ जागा आल्या, असं चंद्रकांत पाटील यांनी या वेळी सांगितलं.

पुढे बोलताना ते म्हणाले की, क्रमांक दोनवर काँग्रेस आणि राष्ट्रवादी हे दोघेही राहिले. दोन्ही पक्षांना १७-१७ जागा मिळाल्या. शिवसेनेच्या फक्त १२ जागा आल्या. शिवसेनेने मुख्यमंत्रीपदासाठी आपला सर्व पक्ष संपावयचं ठरवलं आहे, त्यामुळे त्यांच्या १२ जागा आल्या. आज गावागावात भाजपाची ताकद आहे. स्थानिक पातळीवर राष्ट्रवादीपेक्षा शिवसेनेचे लोक कमी संख्येत आहेत, असा टोलाही चंद्रकांत पाटील यांनी या वेळी लागवला.

आगामी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भाजपच्या चिन्हावर लढवल्या जातील. स्थानिक पातळीवर एखादा निर्णय घ्यायचा असेल तर त्या-त्या जिल्हाध्यक्षांनी भाजप प्रदेशाध्यक्ष म्हणून माझ्यासोबत आणि विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केल्याशिवाय कोणताही निर्णय परस्पर घ्यायचा नाही, असं चंद्रकांत पाटील यांनी या वेळी सांगितलं. भल्याभल्यांचे मनसुबे धुळीला मिळवत भाजपने मिळवलेलं यश कौतुकास्पद असल्याचं चंद्रकांत पाटील यांनी या वेळी म्हटलं. या वेळी माजी आमदार शिवाजीराव नाईक, जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज देशमुख, राहुल महाडिक, संग्रामसिंह देशमुख, सत्यजित देशमुख, स्वप्नील पाटील, परशुराम नागरगोजे, रमेश साबळे, विठ्ठल खोत यांचा सत्कार कऱण्यात आला.

# चिरनेर बेलडोंगरी येथील आग विझविण्यात यश

**उरण : प्रतिनिधी**

चिरनेर येथील बेलडोंगरी परिसरात काही समाजकंटकांकडून लागलेली आग विझविण्यात निसर्गासाठी काम करणाऱ्या वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेच्या सदस्यांना यश आले आहे. डोंगरांवरील गवत सुकल्यानंतर काही समाजकंटकांकडून डोंगरांना आगी लावण्याचे काम सुरू झाले आहे. या आगी लावल्यामुळे निसर्गसंपदा नष्ट होत असून, अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती जळून नष्ट होत आहेत.

झाडाझुडपात वास्तव्य करणाऱ्या पशू-पक्षांची अंडी, सरपटणारे प्राणी होरपळून जात आहेत. त्यांच्या जातीही नष्ट होऊ लागल्या आहेत, मात्र निसर्गामध्ये काम करणाऱ्या संस्था त्यामध्ये वन्यजीव निसर्ग संरक्षण या संस्थेमुळे अनेक प्राणी, पक्षी, साप वाचले आहेत. निसर्ग वाचला आहे. या परिसरात कोठेही आग लागली, तर ते आपल्या जीवावर बेतून विझविण्याचे काम करतात. गेल्या वर्षी या संस्थेने कलम डोंगराला



लागलेली आग सतत तीन दिवस आटोकाट प्रयत्न करून विझविली होती.

या वर्षी वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेने जवळ जवळ दोन हजारपेक्षा अधिक वृक्ष चिरनेर येथील बेलडोंगरी या ठिकाणी वनखात्याच्या परवानगीने लावले आहेत. त्याचे संवर्धनही सुरू आहे, मात्र काही समाजकंटकांकडून डोंगरांना आग लावण्याचे कृत्य केले जात आहे. आज लागलेली आग संस्थेच्या सदस्यांकडून आणि आदिवासी बांधवांकडून विझविण्यात आली.

# मांडवा सागरी पोलीस ठाण्याचा तटरक्षक दलाकडून सन्मान

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

मांडवा सागरी पोलीस ठाण्याला भारतीय तटरक्षक दलाकडून दिला जाणारा बेस्ट अशोर युनिट २०१९-२० पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. मार्च २०२० मध्ये मांडव्याजवळ समुद्रात झालेल्या बोट दुर्घटनेत आठ प्रवाशांचे जीव वाचवल्याबद्दल मांडवा पोलीस ठाण्याला हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

दिल्ली येथे गुरुवारी (दि. २५) विज्ञान भवन येथे हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. या वेळी भारतीय तटरक्षक दलाचे प्रमुख डॉ. के. नटराजन उपस्थित होते. त्यांच्या हस्ते बेस्ट अशोर युनिट २०१९-२० सन्मान प्रदान करण्यात आला.

मार्च २०२० रोजी मांडवा जेट्टी येथील अल् फतेह प्रवाशी बोट बुडत होती. या वेळी मांडवा पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक प्रशांत घरत यांनी प्रसंगावधान राखून जवळ असलेल्या सदगुरू कृपा या बोटीच्या मदतीने आठ प्रवाशांची सुखरूप सुटका केली होती. या मदत व बचाव कार्याची दखल घेऊन पोलीस ठाण्याला सन्मानित करण्यात आले आहे.




# दिघी-पुणे राष्ट्रीय महामार्गावर दुचाकीला अपघात; महिला जखमी

**म्हसळा : प्रतिनिधी**


दिघी पोर्ट ते जळगाव या नव्याने होणाऱ्या ७५३ एफ या राष्ट्रीय महामार्गाच्या नियोजित म्हसळा बायपास (तोंडसुरे) जवळ दुचाकीला अपघात झाला. या अपघातात ४५ वर्षीय महिला गंभीर जखमी झाल्याची घटना मंगळवारी (दि. ३०) सायंकाळी घडली.

वारळ येथील ऋतिक पांडुरंग चाळके (वय २१, रा. वारळ) हा आपल्याजवळील एमएच ०२ सीके ८९४४ या पल्सर मोटरसायकलने वारळहून म्हसळा शहराकडे येत होता. तो तोंडसुरे गावाजवळ आला असता दुचाकीला कुत्रे आडवे आल्याने अपघात झाला. या वेळी दुचाकीवरील चालकाची आई रेश्मा पांडुरंग चाळके (वय ४१) या दुचाकीवरून पडून गंभीर जखमी झाल्या. ग्रामीण रुग्णालय म्हसळा येथे त्यांना उपचारासाठी दाखल केले. अपघाताचे स्वरूप पाहून डॉ. सोनाली जुन्नरकर यांनी जखमी महिलेवर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी अलिबाग जिल्हा रुग्णालयात पाठविले.

# विविध मागण्यांसाठी चाणजे शेतकरी संघर्ष समितीचे बेमुदत उपोषण

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी, तसेच शेतकऱ्यांवर, स्थानिक भूमिपुत्रांवर झालेल्या अन्यायाच्या निषेधार्थ चाणजे शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यमातून मंगळवारी (दि. ७ डिसेंबर)पासून सिडको कार्यालय, द्रोणागिरी येथे बेमुदत उपोषण करण्याचा इशारा अध्यक्ष अविनाश म्हात्रे यांनी प्रशासनाला दिला आहे. चाणजे शेतकरी संघर्ष समितीने शासन दरबारी अनेक वेळा कायदेशीर, शांततेच्या मार्गाने पत्रव्यवहार करून देखील शासनाने शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या समस्यांकडे वर्षानुवर्षे दुर्लक्ष केले आहे. चाणजे हद्दीतील अतिक्रमण, तसेच समुद्राचे



पाणी व खारफुटीचे अतिक्रमण झालेल्या शेतजमिनीची शासनाने नुकसानभरपाई द्यावी अन्यथा संबंधित जमीन संपादित करावी. साकवावर हाईट गेज पूर्ववत करणे, साकवाची प्लॅप गेट कायमस्वरूपी ठेवणे, शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करणे आदी विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.

या मागण्यांसाठी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, प्रधान सचिव महसूल विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक कांदळवन कक्ष मुंबई, जिल्हाधिकारी रायगड, तहसीलदार उरण, भूमी व भूसंपादन अधिकारी सिडको नवी मुंबई, सहाय्यक पोलीस आयुक्त न्हावा शेवा बंदर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक उरण पोलीस ठाणे आदी ठिकाणी अविनाश म्हात्रे यांनी पत्रव्यवहार केला आहे. या मागण्या त्वरित मान्य झाल्या नाही तर मंगळवारपासून बाधित शेतकऱ्यांद्वारे सिडको कार्यालय द्रोणागिरी येथे बेमुदत उपोषण करण्यात येईल. तसेच होणाऱ्या परिणामास प्रशासन जबाबदार राहील, असा स्पष्ट इशारा चाणजे शेतकरी संघर्ष समितीने प्रशासनाला दिला आहे.

# पनवेल महापालिकेची कामोठे आणि घोट येथे कारवाई

**पनेवल : वार्ताहर**

येथील महापालिका कार्यक्षेत्रातील कामोठे तसेच घोट गाव येथील अनधिकृत बांधकामांवर मंगळवारी (दि. ३०) धडक कारवाई करण्यात आली. गेल्या काही काळापासून महापालिका क्षेत्रातील घोट येथे अनधिकृत बांधकामांमध्ये वाढ होताना दिसत असल्याने आयुक्त गणेश देशमुख यांच्या आदेशानुसार उपायुक्त सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी कारवाई करून अनधिकृत बांधकामे तोडण्यात आली. जेसीबी तसेच पोलीस संरक्षणात ही कारवाई करण्यात आली.




सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, प्रभाग समिती 'अ'चे प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी, प्रभाग अधिकारी सदाशिव कवठे, प्रभाग 'अ'चे सर्व स्वच्छता निरीक्षक, कर्मचारी या वेळी उपस्थित होते तसेच कामोठे येथील सेक्टर १८, २२, ३५, ३६ येथील अनधिकृत झोपड्या, अनधिकृत टपाऱ्या यांच्यावर कारवाई करण्यात आली. जेसीबी, पोलिसांसह सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, प्रभाग अधिकारी अरविंद पाटील, अतिक्रमण पथकप्रमुख व दोन्ही शिफ्टचे कर्मचारी, पोलीस कर्मचारी व प्रभाग कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

# 'रेल्वे उपनगरीय क्षेत्राची मर्यादा रोहा व अलिबागपर्यंत वाढवा'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाने व मध्य रेल्वे, कोकण रेल्वे यांनी रोहापर्यंतची प्रवासी रेल्वे वाहतूक उपनगरीय क्षेत्र जाहीर करून लोकसेवा किंवा मेमू सेवा सुरू करणे काळाजी गरज आहे, असे मत पनवेल प्रवासी संघाचे अध्यक्ष व आयुर्वेदाचार्य डॉ. भक्तिकुमार दवे यांनी व्यक्त केले आहे.

मुंबई, नवी मुंबई, पनवेल व त्याची उपनगरे यामध्ये दिवसेंदिवस लोकसंख्येचे प्रमाण वाढते आहे. अंतरराष्ट्रीय विमानतळही पनवेलजवळच उभारले जात आहे. त्यामुळे खाजगी व सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरील ताण वाढत आहे.

याबाबत बोलताना प्रवासी संघाचे कार्यवाह व उपनगरीय रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य यांनी या संबंधात संबंधितांशी चर्चा करून व पत्रव्यवहार चालू असल्याचे सांगितले आहे. हा विषय केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या प्रवासी सुविधांविषयी संसदीय समितीसमोर मांडण्याचेही प्रवासी संघाने ठरविले आहे. यामध्ये पेण, अलिबाग, रेल्वेची प्रवासी सेवा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.


## जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल.

(सोसायटी अॅक्ट १८६० - क्र.४५/९२ मुंबई विश्वस्त अधिनियम १९५० - क्र.एफ १६१७)

## वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना

### (फक्त सभासदांसाठी)

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची एकतिसावी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरूवार दिनांक ३० डिसेंबर २०२१ रोजी सायंकाळी ०४.०० वाजता संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस, कॉमर्स अॅन्ड सायन्स कॉलेज (ऑटोनॉमस), रूम नं.४, स्किल डेव्हलपमेंट सेंटर, प्लॉट नं.१, सेक्टर ११, खांदा कॉलनी, नवीन पनवेल येथे खालील कामांचा विचार करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे.

गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास नियोजित वेळेच्या अर्ध्या तासानंतर तीच सभा त्याच ठिकाणी त्याच कामांचा विचार करण्यासाठी भरविण्यात येईल व अशा पुन्हा भरलेल्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.

तरी आपण या सभेस अवश्य उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**सभेपुढील कामे**

१. २९ डिसेंबर २०२० रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज वृत्त वाचून कायम करणे.
२. मागील सर्वसाधारण सभेपासून आजपर्यंत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाने घेतलेल्या निर्णयांना व केलेल्या कार्यवाहीला मंजूरी देणे.
३. ज.भ.शि.प्र. संस्थेचे २०२०-२०२१ सालचे हिशोब तपासनिसांनी प्रमाणित केलेले जमाखर्च व ताळेबंद व हिशोब तपासनिसांचा अहवाल वाचून मंजूर करणे.
४. सन २०२१-२०२२चे अंदाजपत्रक मंजूर करणे.
५. सन २०२१-२०२२ सालाकरीता हिशोब तपासनिसांची नेमणूक करणे.
६. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळच्या विषयांवर चर्चा करणे.

ठिकाण :- नवीन पनवेल
दिनांक :- ३० नोव्हेंबर २०२१

**सही/-**
**मा. श्री. अरूण जगन्नाथ भगत**
**अध्यक्ष**
**जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल.**

टीप :-१. मा. सदस्यांना काही सूचना करावयाच्या असतील अगर प्रश्न विचारावयाचे असतील तर ते लेखी स्वरूपात सभेच्या ७ दिवस अगोदर पोहोचतील असे संस्था सचिवांकडे पाठवावेत. त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा अगर सूचनांचा विचार करण्यात येणार नाही.
२. ज्या सभासदांची निवासस्थाने बदलली असतील त्यांनी आपला बदललेला पत्रव्यवहाराचा पत्ता संस्थेच्या कार्यालयात कळवावा.


पान १ वरून

## सुनील तटकरे राष्ट्रवादी नव्हे; कुटुंबवादी

जाधवांनी कुणबी समाजाचा अपमान केला आहे, तसेच शिवसेना-राष्ट्रवादी आणि पुन्हा शिवसेना अशी राजकीय वारी करणाऱ्या आमदार जाधवांचे आपण मार्गदर्शन घेऊ, असे अनेक उपरोधिक टोले लगावले होते. त्यामुळे संतापलेल्या जाधवांनी पत्रकार परिषद घेत तटकरेंवर जोरदार शाब्दिक हल्ला चढवला.

बोगस कंपन्या काढून हजारो कोटी रुपये लुबाडायचे, गोरगरीब शेतकऱ्यांच्या शेकडो एकर जमिनी हडपायच्या अशा नीतिमत्ता गमावलेल्या व उपकारांची जाण नसलेल्या सुनील तटकरे यांना मी मार्गदर्शन करूच शकत नाही, असा प्रतिटोला आमदार जाधव यांनी या वेळी लगावला.

आमदार भास्कर जाधवांनी केलेल्या या टीकेला आता खासदार सुनील तटकरे काय उत्तर देतात हे पाहावे लागणार आहे, मात्र राज्यात महाविकास आघाडी सत्तेत असतानाही स्थानिक पातळीवर आघाडीतील नेत्यांचे वेळोवेळी खटके उडत असल्याचे चित्र आहे.

# कायद्याचे राज्य होण्यासाठी अनुशासित समाजाची गरज -प्रा. बापूराव बनसोडे

**उरण : वार्ताहर**

समाजात रामराज्य, ग्रामराज्य यापेक्षाही महत्त्वाचे कायद्याचे राज्य आवश्यक आहे आणि असे नियमांना श्रेष्ठ मानणारा समाज अनुशासित व नियमयुक्त वर्तन असेल तरच निर्माण होऊ शकतो. याकरिता आपण सर्वांनी भारतीय राज्यघटनेवर नितांत प्रेम करणे व विश्वासाने राज्यघटनेच्या तत्त्वांचे पालन करण्याचे पवित्र कार्य केले पाहिजे. तरच समाज अनुशासित बनू शकतो. असा कायद्याच्या चौकटीत वावरणारा समाज जंगलराज किंवा झुंडशाहीला नाकारतो म्हणजेच अशा ठिकाणी तालिबान सारखी व्यवस्था निर्माण होऊ शकत नाही, असे प्रतिपादन प्रा. बापूराव बनसोडे यांनी केले. राष्ट्रीय कायदा दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालयामध्ये राज्यशास्त्र विभाग व एनएसएस यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच भारतीय संविधान दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. बापूराव बनसोडे, तर अध्यक्ष म्हणून उपप्राचार्य डॉ. विलास महाले उपस्थित होते. समारंभाचे प्रास्ताविक व उद्देश राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. संदीप




घोडके यांनी केले.

या वेळी प्रा. एम. सी. सोनवले, राम गोसावी, दिलीप केंगार, अमोद ठक्कर, सोलोमन, श्रीकांत गोतपगार, सुजाता पाटील, भगत मॅडम उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागातील डॉ. विद्या नावडकर यांनी सुरेख पद्धतीने केले. याच कार्यक्रमात भारत सरकारमधील यूजीसी व महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशाप्रमाणे भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे सामूहिक वाचन राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. संदीप घोडके यांनी केले. कार्यक्रम चांगल्या पद्धतीने साजरा केल्याबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर, सर्व स्थानिक व्यवस्थापन समितीतील सदस्य आणि महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साहेबराव ओहोळ यांनी विद्यार्थी, कार्यक्रमाचे संयोजक प्रा. डॉ. संदीप घोडके यांचे व सर्व सहकाऱ्यांचे कौतुक केले आहे. आभार प्रा. चिंतामण धिंगळे यांनी मानले.

# कोविड सेंटर पुन्हा सुरू करा

## ‘ओमिक्रॉन’च्या पार्श्वभूमीवर कोकण आयुक्तांचे निर्देश

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोरोना विषाणूच्या ‘ओमिक्रॉन’ या उत्परिवर्तीत विषाणूला अटकाव करण्यासाठी कोकण विभागातील यंत्रणांनी आतापासूनच दक्ष राहावे. विषाणूच्या नव्या प्रकाराला ओळखणारे चाचणी किट्स मिळण्याबाबत पाठपुरावा करावा. कोविड चाचण्यांची संख्या वाढवावी, तसेच कोकण विभागातील ऑक्सिजन प्लॅन्टची क्षमता वाढविण्यावर भर द्यावा. कोविड काळात तयार करण्यात आलेले कोविड सेंटर पुन्हा सुरू करण्याचे निर्देश कोकण विभागीय आयुक्त विलास पाटील यांनी आज येथे दिले.



कोरोना विषाणूच्या ओमिक्रॉन या उत्परिवर्तीत विषाणूमुळे येणाऱ्या संभाव्य तिसऱ्या लाटेला अटकाव करण्यासंदर्भात आज विभागीय आयुक्त श्री. पाटील यांनी विभागातील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची बैठक घेतली. त्या वेळी त्यांनी संभाव्य लाटेच्या तयारीचा आढावा घेतला व पुढील काळात राबवावयाच्या उपाययोजनांबद्दल सूचना केल्या.

कोकण भवन येथे आयोजित या बैठकीस रत्नागिरीचे जिल्हाधिकारी डॉ. बी. एन. पाटील, सिंधुदुर्गचे जिल्हाधिकारी के. मंजुलक्ष्मी, पालघरचे जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ, ठाण्याच्या प्रभारी जिल्हाधिकारी वैदेही रानडे, ठाण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भाऊसाहेब दांगडे, पालघरचे सिद्धाराम सालीमठ, रायगडचे डॉ. किरण पाटील, रत्नागिरीच्या डॉ. इंदूराणी जाखड, सिंधुदुर्गचे प्रजित नायर, मुंबई शहरचे अप्पर जिल्हाधिकारी अरुण अभंग, महसूल उपायुक्त मकरंद देशमुख, उपायुक्त मनोज रानडे, उपायुक्त गिरीश भालेराव, उपायुक्त संजय पाटील, उपायुक्त वैशाली चव्हाण, उपायुक्त रवींद्र जाधव, उपायुक्त सोनाली मुळे, उपायुक्त पंकज देवरे आदींसह विविध अधिकारी उपस्थित होते.

श्री. पाटील म्हणाले की, सध्या कोरोनाच्या नव्या उत्परिवर्तीत विषाणूचा धोका राज्यात येण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर कोकण विभागातील प्रशासनाने आतापासून तयारी करावी. कोरोना संसर्ग रोखण्यासाठी लसीकरण महत्त्वाचे आहे. त्यासाठी आपापल्या जिल्ह्यातील नागरिकांच्या लसीकरणाचे प्रमाण १०० टक्के करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी नवनवीन उपक्रम राबवावेत. लसीकरणाबाबत गावपातळीवर जनजागृती करावी. जिल्ह्यात लसींच्या पहिल्या व दुसऱ्या डोसचा तुटवडा होणार नाही, हे पाहावे. विमानतळावरून येणाऱ्या प्रवाशांवर विशेष लक्ष द्यावे. प्रवाशांच्या विलगीकरणासाठी नियोजन करावे. परदेशातून कोकणात मोठ्याप्रमाणात पर्यटक येतात त्यांच्या कोविड चाचण्यांबाबत विशेष नियोजन करावे. कोविड रुग्ण वाढून पुन्हा लॉकडाऊन लागू नये, या निर्धाराने नियमित मास्क वापरणे, अनावश्यक गर्दी न करणे, सुरक्षित अंतर पाळणे यासाठी पुन्हा जनजागृती करावी. मास्क न वापरणारे, नियम तोडून अनावश्यक गर्दी करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देशही श्री. पाटील यांनी या वेळी दिले.

कोरोनाचा संसर्ग पुन्हा वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर विभागातील ज्या ठिकाणी ६ डिसेंबर रोजी ग्रामपंचायतीचे मतदान होणार आहेत. त्या ठिकाणी कोरोना प्रतिबंधक नियमांचे काटेकोरपणे पालन व्हावे, यासाठी नियोजन करण्याचे निर्देशही श्री. पाटील यांनी या वेळी दिले.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून स्मार्टवर्क करण्याची संकल्पना या वेळी विभागीय आयुक्तांनी मांडली. सर्व महसूल कार्यालयांनी प्राथमिक तत्त्वावर ई-ऑफिस, ऑनलाईन पेन्शन प्रणालीसारख्या अद्ययावत कार्यप्रणालींच्या वापरावर भर देण्याच्या सूचना श्री. पाटील यांनी या वेळी केल्या. या वेळी विविध उपक्रमांच्या अहवालांचे सादरीकरण करण्यात आले, तसेच जलजीवन अभियानाचा आढावाही या वेळी घेण्यात आला.

### *ऑक्सिजन निर्मितीवर भर द्यावा*

*कोकण विभागात सध्या किती ऑक्सिजन निर्मिती होत आहे. किती प्रमाणात ऑक्सिजनचा साठा उपलब्ध आहे, याचा आढावा विभागीय आयुक्तांनी या वेळी घेतला. त्याअनुषंगाने ऑक्सिजन निर्मिती व साठा वाढविण्याबाबत आराखडा तयार करण्याच्या सूचनाही विभागीय आयुक्तांनी या वेळी दिल्या.*

# लाडीवली येथे बचत गटाच्या महिलांसाठी क्षमता बांधणी कार्यशाळा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी येथील लाडिवली येथे महिला बचत गटासाठी एकदिवसीय प्रशिक्षण शिबिर उत्साहात पार पडले. त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास होण्याच्या उद्देशाने ग्रामसंवर्धन सामाजिक संस्था बांधनवाडी या संस्थेच्या वतीने क्षमता बांधणी कार्यक्रमांतर्गत लाडीवली गावातील बचत गटांतील महिलांसाठी शनिवारी (दि. २७) एक दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



ही कार्यशाळा रायगड जिल्हा परिषद शाळा लाडीवली येथे झाली. कार्यशाळेंतर्गत कार्यक्रमाची रूपरेषा मांडणी करणे, स्वागत कसे करावे? भाषण कसे करावे? आभार कसे व्यक्त करावे, त्याचबरोबर सादरीकरण कौशल्य या विषयावर प्रशिक्षक राजेश रसाळ आणि राज्यस्तरीय वक्ते शैलेश कोंडस्कर यांनी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणात शिकवलेल्या विविध कौशल्याची प्रात्यक्षिकेही सादर करण्यात आली. या वेळी ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, बालग्राम प्रकल्प समन्वयक उदय गावंड, समुपदेशक जयेश शिंदे, बालग्राममित्र राजू पाटील, समूह संघटक विपीन माटे, तेजस चव्हाण उपस्थित होते.

## खारघर खाडीपात्रातून बिनदिक्कत रेती उत्खनन

**पनवेल : वार्ताहर**

खारघर खाडीपात्रातून बेसुमार रेतीउपसा केला जात आहे, मात्र महसूल विभागाकडून याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप करीत पर्यावरणप्रेमींनी नाराजी व्यक्त केली आहे.

खारघर सेक्टर ८लगत असलेल्या खाडीत अनधिकृतपणे रेतीउपसा करणाऱ्यांवर पंधरा दिवसांपूर्वी पनवेल तहसील कार्यालयाच्या महसूल पथकाने धाड टाकून रेती उत्खननसाठी वापरले जाणारे संक्शन पंप जागीच तोडून अज्ञात व्यक्तींच्या विरोधात कारवाई केली होती. त्यानंतरदेखील दिवसाढवळ्या खारघर खाडीत बोटीद्वारे खुलेआम रेती उत्खनन करण्यात येत आहे. या बेसुमार रेती उत्खननामुळे पर्यावरणाला धोका उद्भवत आहे. त्यामुळे पनवेल तहसील विभागाकडून खारघर खाडीमध्ये बेकायदा रेती उत्खनन करणाऱ्या व्यक्तींवर कडक कारवाई करून खारघरमध्ये होणारे रेती उत्खनन बंद करावे, अशी मागणी पर्यावरण अभ्यासक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे.





**उरण : भाजप युवा मोर्चा उरण तालुका सदस्य सुरज ठवळे यांचा वाढदिवस सोमवारी आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला. या वेळी भाजप तालुका अध्यक्ष तथा नगरसेवक रवी भोईर, शहर अध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह, नगरसेवक मेराज शेख, तालुका सरचिटणीस सुनील पाटील, युवा मोर्चा शहर अध्यक्ष निलेश पाटील, शेखर तांडेल, रायगड जिल्हा अल्पसंख्याक अध्यक्ष जसिम गॅस, मनोहर सहतिया, हितेश शाह, समीर कुथे आदी उपस्थित होते. सर्वांनी ठवळे यांना शुभेच्छा दिल्या.**

# चांदायली येथील आदिवासींना जातीच्या दाखल्यांचे वाटप

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

सामाजिक आदिवासी संस्था उरण यांच्या वतीने आदिवासी वाडी चिरनेर येथील चांदायली आदिवासींना दीडशे जातीचे दाखले वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ग्रामपंचायतीचे सदस्य रमेश फोफेरकर यांनी भूषविले. या वेळी ग्रामपंचायतीचे सदस्य किशोर भगत, आदिवासी वाडीचे कार्यकर्ते रोशन कातकरी, लक्ष्मी कातकरी, दशरथ कातकरी आदी उपस्थित होते.



# क्षमतेपेक्षा जास्त मालवाहतूक; ५४८ वाहनांवर कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

वाशी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) कार्यालयाच्या वायुवेग पथकाने गेल्या सहा महिन्यांत रस्त्यावरून (ओव्हर लोड) क्षमतेक्षा जास्त वजनाची वाहतूक करणाऱ्या ५४८ वाहनांवर कारवाई केली असून, या वाहनचालकांकडून एक कोटी ४७ लाख ३२ हजार ५०० रुपये इतकी दंडवसुली केली आहे.



व्यावसायिक वाहनांना मालाची वाहतूक करण्यासाठी परिवहन विभागाने वजन क्षमता आखून दिली असून, त्याप्रमाणे मालाची वाहतूक करणे बंधनकारक आहे, मात्र नवी मुंबई शहरात परिवहन विभागाचे नियम पायदळी तुडवत (ओव्हर लोड) क्षमतेपेक्षा जास्त वजनाच्या वाहनांची मोठी वाहतूक सुरू असते. यामध्ये खडी, वाळू आणि डेब्रिज असलेल्या वाहनांचा भरणा अधिक असतो. अतिक्षमतेने वजन भरल्याने वाहनांचा अपघात होण्याची शक्यता जास्त असते. दुसरीकडे न्यायालयाने देखील क्षमतेपेक्षा जास्त वजनाच्या मालाची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे वाशी आरटीओ कार्यालयाच्या वायुवेग पथकांनी क्षमतेपेक्षा जास्त वजनाच्या मालाची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. एप्रिल-२०२१ ते सप्टेंबर-२०२१ या सहा महिन्यात एकूण क्षमतेपेक्षा जास्त वजनाच्या मालाची वाहतूक करणाऱ्या ५४८ वाहनांवर वाशी आरटीओ कार्यालयाच्या वायुवेग पथकांनी कारवाई केली असून, या वाहनचालकांकडून एक कोटी ४७ लाख ३२ हजार ५०० रुपये इतकी दंडवसुली केली आहे. क्षमतेपेक्षा जास्त वजनाच्या मालाची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याचे सत्र यापुढेही सुरूच राहणार आहे, अशी माहिती वाशी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील यांनी दिली.

# ‘सारथी’तर्फे पनवेलमध्ये उद्योजक सत्कार सोहळा

**पनवेल : वार्ताहर**

मराठा उद्योजक सारथी या संस्थेने मराठा उद्योजक सत्कार सोहळ्याचे आयोजन संस्मरण डायनिंग ॲण्ड बँक्वेट्स हॉल, खांदा कॉलनी, पनवेल येथे केले होते. या वेळी पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त विठ्ठल डाके, सहायक आयुक्त राजेश बदर, विख्यात उद्योजक मारुती पवार, कझ गॅसचे ढोबळे आदी उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रामधील मराठा व्यवसायिकांनी महानगरपालिकेचे ॲप डाऊनलोड करून व्यवसाय वृद्धीचा लाभ घेण्याचे आवाहन विठ्ठल डाके यांनी उपस्थितांना केले. या संस्थेमार्फत नुकतेच दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्यामधील तुकाराम सूर्यवंशी, नारायण चव्हाण, अवधूत देशमुख, प्रदीप पडुळे, सचिन पवार, शरद शिंदे, रवींद्र सावंत आणि दत्तात्रेय जाधव, रामदास शेवाळे या उद्योजकांचा पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. महिला उद्योजक राजश्री कदम, विजया मोहिते, कांचन साबळे, स्वाती जाधव आणि माधवी सावंत यांनाही पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

नवउद्योजक कल्पेश गायकर, अमित लेकुरवाळे, शशिकांत जाधव, अमोल पवार, राम निकम, प्रज्योत जावके आणि अवधूत शेळके यांचाही यथोचित गौरव या वेळी करण्यात आला. पनवेलमधील ख्यातनाम उद्योजक बबन बाबर, राम जाधव, दत्तात्रय मुळे, अतुल सावंत, शिवाजी कदम, देवराम हाडवळे, विजय घोडके, विक्रम घोरपडे, माऊली तांगडे आणि राजू नलावडे आदींचाही सत्कार करण्यात आला. सामाजिक क्षेत्रात कार्य करणारे सभासद बाळासाहेब पवार (नॅशनल बँक), दशरथ पाटील, राजेश बदर, विजय चव्हाण, गौरव जागी, सदानंद शिर्के, स्वप्नील काटकर आणि विष्णू साळुंखे यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण भोसले यांनी केले व उपस्थितांचे आभार अनुराज लेकुरवाळे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मराठा उद्योजक सारथी टीम, महेश चव्हाण, किरण भोसले, अनुराज लेकुरवाळे, शिवाजी देशमुख, सुशांत चव्हाण व शिवाजी कदम आदींनी परिश्रम घेतले.

# कळंबोलीतील लिमये महाविद्यालयाने सुरू केले फिरते वाचनालय



**कळंबोली : बातमीदार**

सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील शिक्षणमहर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालयाने शिक्षणमहर्षी दादासाहेबांच्या ११२व्या जयंतीचे औचित्य साधून फिरते वाचनालय सुरू केले आहे.

२१व्या शतकातील सोशल मीडियाच्या दुनियेत विद्यार्थी, नागरिक व समाज जीवनामध्ये वाचन संस्कृतीची ओळख रुजावी, नागरिकांनी वाचनाचा छंद जोपासावा याकरिता महाविद्यालयाने हा उपक्रम राबविला आहे. या वाचनालयाचा उपयोग महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या गावातील विद्यार्थी, नागरिकांसाठी होणार आहे. याकरिता महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व नागरिकांनीही फिरत्या वाचनालयाला ग्रंथदान केले आहे.

शिक्षणमहर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालयात दादासाहेब लिमये यांची ११२वी जयंती मोठ्या उत्साहात विविध कार्यक्रम आयोजन करून साजरी करण्यात आली. एनएसएसचे जिल्हा समन्वयक व कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बी. बी. जाधव यांनी शिक्षणमहर्षी दादासाहेब लिमये यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. सी. लहूपचांग होते. या वेळी मंजुश्री सुळे, पंचरत्ना पनाड, अरबाज पिंजारी, निखिल दौंडकर यांनी मुंबई विद्यापीठाचे नेतृत्वगुण विकास शिबिर पूर्ण केले असल्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात आला. एसवायबीएच्या पंचरत्ना पनाड व मनीषा पुकळे यांना जिल्हास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळाल्याबद्दल प्रमाणपत्र देऊन सत्कार केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंजुश्री सुळे, प्रेरणागीत शारदा भोसले, मेघा चोरगे, तसेच पाहुण्यांची ओळख तेजस महाजन व आभार पंचरत्मा पनाड यांनी मानले.

# ‘आरटी-पीसीआर’साठी पनवेल पालिका उभारणार लॅब



**खारघर : प्रतिनिधी**

कोरोनाचा प्रादूर्भाव रोखण्यात पनवेल पालिकेला यश आले असून, महापौर कविता चौतमोल यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेने आतापर्यंत उत्तम कामगिरी केली आहे. दरम्यान, ओमिक्रोन या कोरोनाच्या नवीन व्हेरिएंटमुळे पुन्हा एकदा कोरोनाचा धोका उद्भवला आहे. आफ्रिकेत आढळलेल्या या व्हेरिएंटबाबत देशातदेखील हाय ॲलर्ट दिला गेला आहे. याच पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. जास्तीत जास्त टेस्टिंग करण्याच्या दृष्टीने पालिका स्वतःच्या मालकीची लॅब उभारणार असल्याची माहिती पालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी दिली आहे.

तिसऱ्या लाटेचा संभाव्य धोका पुन्हा एकदा निर्माण झाल्याने कोविडचे नियम काटेकोर अंमलबजावणीसाठी पालिका प्रशासन कठोर पावले उचलणार आहे. याचा भाग म्हणून मास्क, तसेच सोशल डिस्टसिंगसह सर्व नियम पाळले जात आहेत की नाही याकरिता मार्शल नेमले जाणार आहेत. पालिका आयुक्तांच्या मार्फत पालिका क्षेत्रातील सर्व प्रयोगशाळेला पत्र लिहून सूचना केली जाणार आहे की टेस्टिंग केलेल्या अहवालांचे एस जीन्स निगेटिव्ह स्वरूपात आढळल्यास त्वरित त्याची माहिती पालिका प्रशासनाला देण्याबाबत सक्त ताकीद दिली जाणार आहे.

कोरोना अहवालात एस जीन्स निगेटिव्ह आढळला, तर ओमिक्रोन या नव्या व्हेरिएंटच्या विषाणूचा धोका अधिक असल्यानेच याबाबत पालिका प्रशासनाने प्रयोगशाळांना पत्र लिहून याबाबत माहिती देण्याच्या सूचना केल्या आहेत. परदेशातून येणाऱ्या नागरिकांची माहिती मिळावी याकरिता पालिका क्षेत्रातील सर्व सोसायट्यांना पालिका प्रशासनाने पत्रव्यवहार केले आहे. परदेशातून येणाऱ्या नागरिकांचे विलगीकरण करण्याच्या दृष्टीने हॉटेल्समध्ये या नागरिकांचे विलगीकरण केले जाणार असल्याची माहिती आयुक्त गणेश देशमुख यांनी दिली.

## संपादकीय

# शाळेचा पहिला दिवस?

हो–ना करता करता १ डिसेंबरपासून राज्यातील शाळांची घंटा वाजणार हे स्पष्ट झाल्यानंतर सर्वांनीच सुटकेचा निःश्वास सोडला होता. जवळपास दोन शैक्षणिक वर्षांची पुरती वाट लागल्यानंतर शिक्षणाने गाडे टप्प्याटप्प्याने का होईना पुन्हा सुरू होणार होते, परंतु पहिल्या घासालाच मिठाचा खडा लागावा, तसे काहीसे घडले. कोरोनाच्या ओमायक्रॉन या उत्परिवर्तित विषाणूमुळे पुन्हा एकदा शाळा सुरू होण्याबाबत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**सध्या राज्यातील ग्रामीण भागात पाचवी ते बारावी आणि शहरी भागात आठवी ते बारावीच्या शाळा सुरू झाल्या आहेत. बुधवारपासून म्हणजेच १ डिसेंबरपासून पहिलीपासूनचे सर्व वर्ग सुरू करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने जाहीर केला होता. आरोग्य विभागाने आणि डॉक्टरांच्या कृती गटाने त्याला हिरवा कंदिल दाखवला होता. तेवढ्यात ओमायक्रॉनच्या आगमनाची धडकी भरवणारी बातमी येऊन थडकली. ओमायक्रॉन या कोरोना विषाणूच्या नव्या अवताराचा प्रसार फार वेगाने होतो असे दिसून आले आहे. या विषाणूची बाधा झालेला एकही रुग्ण भारतात अद्याप तरी सापडलेला नाही, परंतु आपल्याकडे लहान मुलांचे लसीकरण देखील झालेले नाही हेही लक्षात घ्यावे लागेल. नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश जारी करणारी नियमावली जाहीर करून सरकारने हात झटकता कामा नयेत. नियमावलीतील निर्बंधांची अंमलबजावणी हा येथे कळीचा मुद्दा ठरतो. कारण एकदा सारे उघडले की निर्बंधांची कशी वासलात लागते ते आपण सारे गेली दोन वर्षे पाहतो आहोत. शाळाही त्याला अपवाद असणार नाहीत. म्हणूनच ओमायक्रॉनच्या भीतीमुळे शाळा सुरू करण्याचा निर्णय लांबणीवर टाकावा असा सूर पालकवर्गाने लावला हे स्वाभाविकच म्हणावे लागेल. पालकांनी अशी मागणी केली असली, तरी शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी मात्र शाळा सुरू करण्याचा निर्णय कायम ठेवला आहे. अर्थात शिक्षण विभागाचे अधिकारी काहीही सांगत असले, तरी ठिकठिकाणच्या पालिका आयुक्तांनी मात्र शाळा पुन्हा सुरू करण्याबाबत स्पष्ट नकारघंटा वाजवली आहे. विशेषतः मुंबई, पुणे, नाशिक यांसारख्या महापालिकांच्या हद्दीतील शाळा १५ डिसेंबरनंतरच सुरू करण्याचा निर्णय तेथील स्थानिक प्रशासनाने जाहीर केला आहे. शाळा सुरू करण्यास आरोग्य विभागाचा हिरवा कंदिल असल्याचे आरोग्य मंत्री राजेश टोपे प्रसारमाध्यमांशी बोलताना ठामपणाने सांगतात, परंतु प्रत्यक्षात मात्र चित्र नेमके उलटे दिसत आहे. हा काय प्रकार आहे? पालकवर्गामध्येच प्रचंड संभ्रमावस्था असताना त्यात भर टाकण्याचे काम सत्ताधाऱ्यांकडूनच केले जाते हे अनाकलनीय आहे. आपल्या मुलाला किंवा मुलीला शाळेत पाठवायचे की नाही हा निर्णय बव्हंशी पालकांचा असतो व तसाच तो असायलाही हवा. कारण प्रत्येक पालकासाठी आपल्या मुलाची किंवा मुलीची सुरक्षितता सर्वोच्च प्राधान्याची असते. कोरोनाच्या दोन लाटांमुळे शालेय शिक्षणाचा पुरता खेळखंडोबा झाला आहे. गेले वर्षभराहून अधिक काळ विद्यार्थीवर्गाने घरातूनच अभ्यास करून व्यतित केला आहे. ऑनलाइन शिक्षण किंवा दूरस्थ शिक्षण या पद्धती उपयुक्त आहेत, परंतु त्यालाही काही मर्यादा आहेत. अशा परिस्थितीत सत्ताधारी महाविकास आघाडी सरकारने विद्यार्थ्यांसाठी नेमके काय केले याचे उत्तर मिळणे अवघड होऊन बसते. गेल्या दोन वर्षांच्या महाविकास आघाडी सरकारच्या कारकिर्दीत सर्वाधिक वाटोळे कोणाचे झाले असेल, तर ते विद्यार्थीवर्गाचे झाले. सध्याच्या संभ्रमाच्या काळात शाळेचा पहिला दिवस उजाडणे म्हणूनच धाकधूक वाढवणारे वाटते.**

# पनवेलमध्ये मेन आणि हार्बर लाईन ट्रॅक जोडावेत




**खबरबात**
**नितीन देशमुख**

पनवेलमध्ये उपनगरीय रेल्वे १९९६मध्ये सुरू झाली. या रेल्वेसेवेमुळे पनवेल परिसरात झपाट्याने नागरिकरण होत आहे. पनवेल रेल्वेस्थानकातून वर्षभरात सुमारे ५० कोटी प्रवासी प्रवास करीत असल्याने लवकरच या स्थानकाचा समावेश 'अ १' श्रेणीत होणार आहे. मात्र पनवेल स्थानकात भविष्यात उपयोगी पडणाऱ्या मेनलाईन आणि हार्बरलाईन ट्रॅक जोडण्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे.

पनवेल रेल्वे स्थानकातून हार्बर आणि ट्रान्स हार्बर मार्गावरुन लोकल वाहतूक सुरू असते. दिव्याहून येणाऱ्या लाईनवरुन मेल, एक्सप्रेस आणि मालगाडीची वाहतूक सुरू असते. मध्य रेल्वेच्या पनवेल स्थानकातील फलाट क्रमांक १ ते ४ वरून रोज छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, ठाणा आणि अंधेरी (आजपासून गोरेगाव) अशा ३३३ लोकलच्या फेऱ्या होतात. याशिवाय फलाट क्रमांक ५ ते ७ वरुन मेल व एक्सप्रेसच्या नियमित ५७ आणि तीन हॉलीडे एक्सप्रेस गाड्या जातात. मेनलाईन आणि हार्बरलाईन ट्रॅक एकमेकांना जोडल्यास भविष्यात कोणतीही अडचण आल्यास त्याचा फायदा होऊ शकतो. पण एक किमी लुपच्या या कामाकडे रेल्वेने दुर्लक्ष केले आहे. हे काम पूर्ण झाल्यास प्रवासाचा वेळही वाचू शकतो.

या रेल्वे स्थानकाच्या पूर्वेला म्हणजेच नवीन पनवेल बाजूला मोठ्या प्रमाणात नागरीवस्ती वाढली आहे. रेल्वे स्थानकातील १ ते ४ फलाटावर लोकल तर क्रमांक ५ ते ७ वर मेल आणि एक्स्प्रेस गाड्या येत असतात. नवीन पनवेल बाजूला मोठ्या प्रमाणात रहिवासी वसाहती व शाळा, महाविद्यालये असल्याने विद्यार्थी व प्रवाशांची जा–ये असते. याबाजूला जाण्यासाठी सहा फुट रुंदीचा पूल आहे. लोकल थांबल्यावर अनेक प्रवासी या पुलावर फलाटावरून धावत जात असतात. याच वेळी फलाट क्रमांक ६ किवा ७ वर लांब पल्ल्याची गाडी आल्यास प्रवाशांची कोंडी होते. त्याचा फायदा घेऊन चोरटे प्रवाशांच्या हातातील मोबाईल किंवा पर्स, पाकीट लांबवितात.



नवीन टर्मिनन्सचे काम झाल्यावर अभ्युदय बँकेजवळ भुयारी मार्ग होणार आहे. पण सध्या ते काम खूपच धीम्या गतीने सुरू आहे. पनवेल स्थानकावर रुग्ण, अपंग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी लिफ्टची मागणी करूनही ती बसवली जात नाही. त्यामुळे अपंग किंवा रुग्णांना पूर्व बाजूला किंवा लांब पल्ल्याच्या गाडीसाठी जिना चढून जाता येत नसल्यास उचलून नेण्यासाठी असलेल्या एका खुर्चीसाठी कमीत कमी ८० ते २०० रुपये द्यावे लागते. त्यामुळे मुंबईतून २० रुपयात आलेल्या माणसाला पनवेल स्थानकातून बाहेर पाडण्यासाठी २०० रुपये खर्च करावे लागतात. ते परवडणारे नसल्याने अपंग किंवा रुग्ण व्यक्तीला घरातील माणसांनाच उचलून न्यावे लागते. व्हीलचेअर आहेत पण त्या कोठे मिळतील याची माहिती देणारा फलक स्थानकात कोठेही लावण्यात आलेला नाही.

पनवेलला रेल्वेचे जंक्शन होणार म्हणून काम सुरू आहे. येथे १२ फलाट होणार आहेत. दोन्ही बाजूला गाड्या पार्कींगची सोय, तिकीट घर, प्रतिक्षालय यासाठी नवीन इमारती बांधण्यात येत असताना रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी काही मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष करताना दिसत आहेत. या रेल्वे स्थानकात सरकता जिना बसवण्याची मागणी पनवेल प्रवाशी संघाने आणि अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक संघाने केली होती. सिडकोचे अध्यक्ष असताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे अखेर फलाट क्रमांक ६ आणि ७ वर जाण्यासाठी सरकता जिना बसविण्याचे काम पूर्ण होऊन तो सुरू झाला. पण अनेक वेळा तो बंद असतो. तो सुरू करण्यासाठी माणसे ठेवली आहेत, ती जिन्याच्या खाली बसून मजा बघत असतात. त्याबाबत प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे.

उपनगरीय फलाटाच्या बाजूला कॅफेटेरियाची गरज असल्याची प्रवाशांची अनेक दिवसांची मागणी आहे. नवीन स्टेशन प्लॅनप्रमाणे प्लॅटफॉर्म क्रमांक ३ अणि ४ मालगाडीसाठी जाणार असल्याने त्याची जागा निश्चित करण्यास वेळ लागत असल्याचे सांगण्यात येत आहे. पनवेल स्टेशनच्या पश्चिम बाजूला प्रवाशांना रिक्षावाल्यांचा मोठा त्रास होतो. अनेक रिक्षावाले फलाटापर्यंत येऊन प्रवाशाला आपल्या रिक्षात घेऊन जातात. अशा रिक्षावाल्यांकडून लुटण्याचे अनेक प्रकार घडले असूनही त्यांच्यावर कोणी कारवाई करायची या वादात रेल्वे पोलीस, शहर पोलीस आणि आरटीओ अधिकारी गुंतले असल्याने लूटमारीचा धंदा जोरात सुरू आहे.

# शेतकरी, अधिकाऱ्यांना प्रशिक्षण

**अलिबाग : जिमाका**

मे. ॲस्टेक लाइफ सायन्सस कंपनीतर्फे अलिबाग येथील जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयात सोमवारी (दि. २९) कीटकनाशके विषबाधा प्रकरणी करावयाच्या प्रतिबंधक उपाययोजनांसंदर्भात शेतकरी आणि अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले.




कीटकनाशके खरेदी करताना, ती साठवताना आणि त्यांची हाताळणी करताना घ्यावयाची काळजी, फवारणी द्रावण करताना घ्यावयाची काळजी, योग्य उपकरणांची निवड, प्रत्यक्ष फवारणी करताना आणि ती संपल्यानंतर काय करावे, कीटकनाशकांच्या विषजन्यतेच्या श्रेणीची ओळख फवारणी करताना वापरावयाची सुरक्षा साधने या विषयांवर मे. ॲस्टेक कंपनीचे डॉ. अंकुर पतंगे यांनी मार्गदर्शन केले.

ग्लोबल वार्मिंग परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांनी काय उपाययोजना कराव्यात व सगुना राईट टेक्नॉलॉजी याविषयी एसआरटी तंत्रज्ञान प्रमुख चंद्रशेखर भडसावळे यांनी माहिती दिली. शेतात फवारणी करताना शेतकऱ्यांनी कमी तीव्रतेची कीटकनाशके वापरावीत व स्वतःच्या शरिराची काळजी कशी घ्यावी, असा सल्ला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्वला बाणखेले यांनी या वेळी दिला.

जिल्हा गुणवत्ता नियंत्रक निरीक्षक गोरखनाथ मुरकुटे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. उपविभागीय कृषी अधिकारी कैलास वानखडे, गुप्ता यांच्यासह अन्य कृषी अधिकार व शेतकरी या प्रशिक्षण वर्गाला उपस्थित होते. डॉ. अंकुर पतंगे यांनी आभार मानले.

# मुरूडमध्ये सीएनजी पंप सुरू करावा

## स्थानिक वाहनचालकांसह पर्यटकांची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

डिझेल व पेट्रोल पंपाप्रमाणेच मुरूड तालुक्यात सीएनजी पंपांची सुरू करावेत, अशी मागणी येथील वाहनचालक, मालक व पर्यटक करीत आहेत.



डिझेल व पेट्रोलला पर्याय म्हणून सीएनजीवर चालणाऱ्या गाड्या बाजारात आल्या असून, त्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. सीएनजीवर चालणाऱ्या गाड्या घेणाऱ्यांची संख्या वाढली परंतु त्याप्रमाणात सीएनजी पंपाची संख्या वाढली नाही. त्यामुळे सीएनजी भरण्यासाठी सर्वत्र लांबच लांब रांगा दिसून येतात.

पर्यटन स्थळ असूनसुद्धा मुरूड तालुक्यात एकही सीएनजी पंप नाही. त्यामुळे सीएनजी भरण्यासाठी मुरूड तालुक्यातील वाहनचालकांना ३५ किलोमीटर लांब बागमळा (ता. अलिबाग) येथे जावे लागते. तेथे नेहमीच सीएनजी भरण्यासाठी किमान दोन तास किंवा त्यापेक्षा जास्त वेळ प्रतीक्षा करावी लागते. शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी मुरुड तालुक्यातील प्रत्येक पर्यटनस्थळी किमान १५ हजार पर्यटक भेट देतात. मात्र तालुक्यात सीएनजी पंपाची सुविधा नसल्याने ते हैराण होत आहेत. मुरूड तालुक्यासाठी सीएनजी पंप मिळवून देण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावा, अशी मागणी स्थानिक वाहन चालक, मालक व पर्यटक करीत आहेत.

# माथेरानमध्ये घोड्यांच्या आरोग्य तपासणी शिबिरास प्रतिसाद

**कर्जत : बातमीदार**

पशुसंवर्धन विभागातर्फे माथेरानमधील पशुवैद्यकीय इस्पितळात सोमवारी (दि. २९) घोड्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

मोटरवाहन नसल्यामुळे माथेरानमध्ये घोडा हेच मुख्य वाहन आहे. येथे प्रवासी वाहन घोड्यांची संख्या ४६० इतकी असून मालवाहू घोडे ३०० पेक्षा अधिक आहेत. येथील पशुवैद्यकीय इस्पितळात नव्यानेच रुजू झालेले पशुसंवर्धन अधिकारी अमोल कांबळे यांनी सोमवारी घोड्यांच्या आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. त्याला अश्वचालकांनी भरभरून प्रतिसाद दिला. शिबिरात घोड्यांना होणाऱ्या सरा रोगाविषयी तापसणी करण्यात आली. प्रत्येक तीन महिन्यांमध्ये घोड्याला टिटी इंजेक्शन देणे अनिवार्य असते. मात्र माथेरानमधील पशुवैद्यकीय इस्पितळात मार्चपासून डॉक्टर नव्हते.त्यामुळे अश्वचालकांची गोची झाली होती. सोमवारी झालेल्या शिबिरात घोड्यांना टिटी इंजेक्शन देण्यात आले.

या शिबिरात पशुधन अधिकारी सागर कसबे, परिचारक राम तिटकारे, स्वप्नील राजपूत यांनी सहकार्य केले. घोड्यांच्या आरोग्य तपासणी शिबिरामुळे आम्हा घोडेवाल्यांना दिलासा मिळाला आहे, असे अश्वचालक संतोष आखाडे यांनी सांगितले.



# 'कोमसाप'च्या अलिबाग शाखेचा वर्धापन दिन साजरा

**अलिबाग : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या (कोमसाप) अलिबाग शाखेचा १९ वा विर्धापन दिन नुकताच तालुक्यातील खंडाळा येथे संपन्न झाला. या वेळी सभासदांनी स्वलिखित विविध प्रकारच्या साहित्याचे वाचन केले. यावेळी स्वरालंकार–पेण यांचा गाण्यांचा कार्यक्रम झाला.

डॉ. चंद्रकांत वाजे यांच्या खंडाळा येथील फार्महाऊस येथे कोमसाप अलिबाग शाखा अध्यक्ष पुजा वैशंपायन यांच्या अध्यक्षतेखाली वर्धापनदिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कोमसापचे रायगड जिल्हा अध्यक्ष संजय गुंजाळ व केंद्रीय जनसंपर्कप्रमुख एल. बी. पाटील तसेच अलिबाग शाखेचे सभासद या वेळी मोठ्या संख्येन उपस्थित होते.

उपस्थित सदस्यांनी स्वलिखित कविता, कथा, लेख, पत्र, परीक्षण इत्यादी साहित्याचे वाचन केले. रसिका वाजे उत्कृष्ट रांगोळी काढतात. त्याचे छायाचित्र व्हॉट्सअॅप ग्रुपवर टाकले जाते. त्यावर सदस्य चारोळी, काव्य, वर्णनात्मक लेख लिहितात. हा उपक्रम वर्षभर चालू असतो. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वाजे कुटूंबीयांचा सत्कार करण्यात आला. स्वरालंकार यांनी गाण्यांचा कार्यक्रम सादर केला. मंजुषा कुलकर्णी, अविनाश देव यांनी हिंदी, मराठी गाणी सादर केली. त्यांना बल्लाळ ढवळे (तबला), हर्षल पाटील (पखवाज), अथर्व देव (हार्मोनियम) यांची साथ मिळाली. सूत्रसंचालन दविंद्र थळे यांनी केले. या कार्यक्रमासाठी वर्षा दिवेकर, सुजाता पाटील, निर्मला फुलगावकर यांनी सहकार्य केले. श्रद्धा वैशंपायनच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# 'नेरळमधील पेट्रोल पंपाची वेळ वाढवावी'

**कर्जत : बातमीदार**

कल्याण–कर्जत राज्य मार्गावरील नेरळ येथे असलेला पेट्रोलपंप रात्री आठ वाजता बंद होतो. रात्रीच्यावेळी गाड्यांमधील इंधन संपल्यास वाहनचालकांना पुढील प्रवास अडचणींचा ठरू शकतो. त्यामुळे या पेट्रोलपंपाची वेळ सकाळी व रात्री एक तासाने वाढवावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी नेरळ सर्व्हिस सेंटरच्या व्यवस्थापनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नेरळमध्ये भारत पेट्रोलियमचा पंप आहे. नेरळ सर्व्हिस सेंटरच्या या पंपावर सकाळी सहा ते रात्री आठ या वेळेत इंधन उपलब्ध होते. कर्जत–कल्याण राज्यमार्गावर नेरळ येथे हा पंप असून त्यापुढे वांगणी येथे इंधन मिळू शकते. नेरळ परिसरात निर्माण झालेले फार्महाऊसेस आणि माथेरान हे पर्यटन स्थळ असल्याने रात्री उशिरापर्यंत या रस्त्यावर वाहनांची वर्दळ असते. मात्र नेरळ सर्व्हिस सेंटरच्या पेट्रोल पंप २४ तास सेवा देत नाही. त्यामुळे काही वाहनचालकांना इंधन संपल्यास आपली वाहने रस्त्याच्या बाजूला उभी करून जावे लागते. कधीकधी लुटमारीच्या घटनाही घडतात. ते टाळण्यासाठी नेरळ सर्व्हिस सेंटरने सकाळी आणि रात्री एक तास वाढीव सेवा देण्याची मागणी कार्यकर्ते संदीप उतेकर आणि सुरेश राणे यांनी केली आहे. या बाबत चर्चा करून योग्य निर्णय घेऊ असे आश्वासन नेरळ सर्व्हिस सेंटरच्या व्यवस्थापनाने दिले आहे.



(छाया : संतोष पेरणे)

# श्रेय घेण्यावरून राष्ट्रवादी, शेकापमध्ये तू तू मैं मैं!

## ■ उमरोली पाणीपुरवठा योजनेचे दुसऱ्यांदा होणार भूमिपूजन

**माणगाव : प्रतिनिधी**

शासनाच्या जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत माणगाव तालुक्यातील खरवली उमरोली येथे नळ पाणीपुरवठा योजना मंजूर झाली आहे, मात्र या पाणी योजनेचे श्रेय घेण्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस आणि शेकाप यांच्यात चांगलीच जुंपली आहे. या योजनेचे भूमिपूजन पहिल्यांदा रविवारी (दि. २८) पालकमंत्री आदिती तटकरे यांनी केले. त्यानंतर येत्या शनिवारी (दि. ४) सायंकाळी ४ वाजता शेकापचे आमदार जयंत पाटील या योजनेचे पुन्हा दुसऱ्यांदा भूमिपूजन करणार आहेत.



नळ पाणीपुरवठा योजनेचा भूमिपूजन समारंभ पहिल्यांदा २८ नोव्हेंबर रोजी रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते झाले होते. आता पुन्हा याच पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन ४ डिसेंबरला सायंकाळी ४ वाजता शेकापचे आमदार जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व हस्ते दुसऱ्यांदा होणार आहे. या कार्यक्रमास माजी आमदार पंडित पाटील, जि.प. अध्यक्ष योगिता पारधी, माजी अध्यक्ष सुप्रिया पाटील, मोर्बा येथील शेकापचे ज्येष्ठ नेते अस्लम राऊत, जि. प. सदस्य आरती मोरे आदी उपस्थित राहणार असल्याची माहिती शेकापचे तालुका चिटणीस रमेश मोरे यांनी प्रसार ाध्यमांजवळ बोलताना दिली. उमरोलीतील या पाणी योजनेच्या श्रेय वादावरून तालुक्यात चांगलीच चर्चा रंगली आहे.

उमरोली येथील ४२ लाख ७० हजार रुपयांची नळ पाणीपुरवठा योजना खासदार सुनील तटकरे यांच्या माध्यमातून मंजूर झाल्याचे रविवारी पालकमंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले, तर ही योजना शेकापचे जेष्ठ नेते अस्लम राऊत, जि. प. सदस्य आरती मोरे व माझ्या प्रयत्नांतून मंजूर झाल्याचे तालुका चिटणीस रमेश मोरे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले. त्यामुळे ही नळ पाणीपुरवठा योजना चांगलीच चर्चेत आली आहे. आता शनिवारी आमदार जयंत पाटील याबाबतीत राष्ट्रवादीवर टीकेची काय झोड उठविणार याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# महाड औद्योगिक क्षेत्रातील वायू प्रदूषण मोजणी यंत्रणा वाऱ्यावर

## एअर मॉनिटरींग सिस्टम धूळ खात पडून

**महाड : प्रतिनिधी**

येथील एमआयडीसीमधील वायू प्रदूषण महाड परिसरात नागरिकांच्या जीवावर उठले आहे. रोज पहाटेच्या सुमारास परिसरात दुर्गंधी पसरत आहे. मात्र हवा प्रदूषण मोजणी यंत्रणा गेल्या दोन वर्षापासून ठप्प आहे. यामुळे कंपन्यांतून बाहेर पडणाऱ्या रासायनिक वासाने नागरिक त्रस्त झाले आहेत. नागरिकांच्या तक्रारीवरून प्रदूषण नियंत्रण मंडळाने महाडमधील काही कंपन्यांवर केलेली कारवाईदेखील पोकळ ठरत आहे.

महाड औद्योगिक क्षेत्रात बहुतांश रासायनिक उत्पादन करणाऱ्या कंपन्या आहेत. यामुळे गेल्या अनेक वर्षापासून येथील भू, जल आणि वायू प्रदूषणाचा विषय कायम वादाचा बनला आहे. याबाबत अनेक कंपन्यांना बंदच्या नोटीसादेखील देण्यात आल्या आहेत. महाड एमआयडीसीमधील रासायनिक कंपन्यांचे सांडपाणी आंबेत खाडीत सोडण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र हे सांडपाणी सुरवातीला सव आणि त्यानंतर ओवळे गावाजवळ सोडण्याचा उद्योग एमआयडीसीकडून करण्यात येत आहे. त्यामुळे महाड खाडीपट्टा आणि बिरवाडी परिसरातील जमीन आणि पिण्याचे पाणी प्रदूषित झाले आहे.

एकेकाळी जागतिक यादीच्या 'डर्टी थर्टी' मध्ये महाड औद्योगिक क्षेत्राचा समावेश झाला होता. त्यानंतर बरेच बदल करून हे नाव आता वगळण्यात आले असले तरी आजही अनेक कारखाने आपले सांडपाणी ऐन पावसाळ्यात सोडून देण्यास मागेपुढे पाहत नाहीत. येथील प्रदूषणाकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे दुर्लक्ष झाले आहे. प्रदुषणावर लक्ष ठेवण्यासाठी महाडमध्ये बसवण्यात आलेली यंत्रणादेखील कालबाह्य झाली असून या माध्यमातून केवळ हवेतील सल्फर आणि नायट्रोजन हेच घटक मोजले जात आहेत. मात्र एजन्सीकडून हवेत घातक घटक नसल्याचा अहवाल दिला जात होता. त्यात बदल करत आता एअर मॉनीटरींग सिस्टम बसवण्यात आली आहे. नव्या यंत्रणेद्वारे हवेतील सल्फर, नायट्रोजन आणि इतर वायूचे प्रमाण मोजता येणे शक्य आहे. महाड एमआयडीसीमध्ये धूळ गोळा करणारे डस्ट सप्लर बसवण्यात आले आहेत. या यंत्राने हवेतील धूळ गोळा करून त्यातील सल्फर आणि नायट्रोजनचे घटक मोजले जात आहेत. पीपीएल, अग्निशमन केंद्र, आणि पाणी शुद्धीकरण केंद्र या तीन ठिकाणी हे यंत्र बसवण्यात आले आहेत. धुळीचा किंवा वायू प्रदूषणाचा त्रास जाणवत नाही अशा ठिकाणी हे यंत्र आहे. स्थानिक प्रदूषण नियंत्रण कमिटीच्या शिफारशीनुसार हे यंत्र बसवण्यात येत असल्याची माहिती देण्यात आली.हवेतील दुर्गंधीवरून कोणत्या कंपनीचा वायू हवेत मिसळला आहे, हे शोधणे कठीण असल्याचे मत महाड प्रदूषण नियंत्रण मंडळाने व्यक्त केले आहे.

> **हवा प्रदूषण मोजणी यंत्रणेचे काम यापूर्वी एका महाविद्यालयाला देण्यात आले होते. त्याची मुदत संपल्यानंतर मात्र कोणत्याही एजन्सीकडून प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे एजन्सी नेमण्याबाबतचा नवीन प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. त्याला अद्याप मंजुरी मिळालेली नाही.**
>
> **–जयदीप कुंभार, क्षेत्र अधिकारी, प्रदूषण नियंत्रण मंडळ महाड**

# समाजमंदिराच्या जागेवरून खांडसमध्ये वादावादी

## नेरळ पोलीस ठाण्यात ॲट्रॉसिटी ॲक्टखाली गुन्हा दाखल

**कर्जत : बातमीदार**





तालुक्यातील खांडस येथील सामाजिक सभागृहाच्या जागेवरून वाद निर्माण झाला होता, त्यानंतर तेथे कुंपण टाकण्याच्या वादातून जातीवाचक शिवीगाळ केल्याबद्दल नेरळ पोलीस ठाण्यात ॲट्रॉसिटी ॲक्टखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहाच्या नियोजीत जागेवरुन २६ नोव्हेंबर रोजी खांडस बौध्दवाडा येथे वाद झाला. तेथील जमीन खरेदी केलेल्या हिंदू व्यक्तीने आपल्या जागेबरोबर बाजूच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर या नियोजित सभागृहाच्या जागेत अतिक्रमण करून कुंपण घातले. त्याबद्दल वाद झाला आणि त्यात दाद मागणारे हे बौध्द समाजाचे आहेत हे माहिती असतानादेखील चार आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना लाकडी दांडक्याने तसेच हाताबुक्याने मारहाण करुन दुखापत केली. या भांडणाची व्हिडीओ शूटिंग फिर्यादीच्या बहिणीकडून केले जात होते, त्याचा आरोपी यांना राग आला. त्यातील एका आरोपीने फिर्यादीच्या घरात घुसून मोबाइल खेचण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी झालेल्या झटापटीत फिर्यादी यांच्या बहिणीचा टॉप फाटुन नुकसान केले.

या प्रकरणी नेरळ पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल झाल्यानंतर कर्जत पोलीस उपाधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली ॲट्रॉसिटी ॲक्टखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास कर्जतचे पोलीस उपाधीक्षक करीत आहेत.

# माणगावजवळ तीन वाहनांचा अपघात; तिघे जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई–गोवा महामार्गावर माणगाव तालुक्यातील कशेने गावच्या हद्दीत वॅगनर, ट्रेलर व रुग्णवाहिका या तीन वाहनांचा सोमवारी (दि. २९) सायंकाळी विचित्र अपघात झाला. त्यात तिघेजण जखमी झाले.

फिर्यादी सतीश रमण जाधव (वय ३३, रा. इंदापूर, ता. माणगाव) हे त्यांच्या ताब्यातील शासकीय १०८ रुग्णवाहिका (एमएच–१४,जेएल–३६७७) चालवीत सोमवारी संध्याकाळी माणगावकडे येत होते त्याचवेळी दिलीप धोंडू यादव (वय ६३, रा.शिवाजीनगर, माणगाव) हे त्यांच्या ताब्यातील मारुती वॅगनर (एमएच–०६,सीडी–२००३) ही गाडी घेऊन गोवाबाजूकडे जात होते. त्यांनी कशेने गावच्या हद्दीत विरुद्ध बाजूला येऊन रुग्णवाहिकेला धडक देवून, गोवा बाजूकडे जाणाऱ्या ट्रेलर (एमएच–४३,यु–६०७७) ला ठोकर दिली. या अपघातात फिर्यादी सतीश रमण जाधव, डॉ. विशाल रंगनाथ निमदेव (वय २६, रा. माणगाव), आणि दिलीप धोंडू यादव (वय ६३, रा. माणगाव) हे जखमी झाले.

या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, वॅगनर चालक दिलीप धोंडू यादव यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास महिला पोलीस उपनिरीक्षक अस्मिता पाटील करीत आहेत

# नारंगी परिसरातील शेतकऱ्यांसह आत्मदहन करण्याचा माजी आमदार सुरेश लाड यांचा इशारा

**खोपोली : प्रतिनिधी**

बाधीत शेतकऱ्यांनी खालापूर तहसील कार्यालयासमोर उपोषण करूनदेखील राज्य शासनाला जाग येत नसेल तर शेतकऱ्यांसोबत आत्मदहन करण्याचा इशारा माजी आमदार सुरेश लाड यांनी मंगळवारी (दि. ३०) खालापूर येथे दिला.



खालापूर तालुक्यातील छत्तीशी विभागात महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) प्रस्तावित असून त्यासाठी स्थानिक शेतकऱ्यांची फसवणूक करून जमीन लाटणाऱ्यांच्या विरोधात गेले काही दिवस वेगवेगळ्या मार्गाने आंदोलन करूनही न्याय मिळत नाहीये. त्यामुळे शेतकऱ्यांसोबत आत्मदहन करण्याचा इशारा माजी आमदार सुरेश लाड यांनी मंगळवारी खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांना लेखी निवेदनाद्वारे दिला.

शेतकऱ्यांची फसवणूक करून न्यू मिलेनियम कंपनीने जमिनी लाटल्याचा आरोप राष्ट्रवादीचे भूषण पाटील आणि स्थानिक शेतकऱ्यांकडून केला होता. स्थानिक लोकप्रतिनिधींचा या प्रकरणात प्रत्यक्ष सहभाग असून त्यांनी नातेवाईकांच्या नावे जमिनी खरेदी केल्याचा दावाही शेतकरी आणि भूषण पाटील यांच्याकडून केला गेला आहे. या संदर्भात न्याय मिळावा यासाठी शेतकऱ्यांनी खालापूर तहसील कार्यालयासमोर उपोषण केले होते. शेतकऱ्यांना कंपनीने दिलेले धनादेश वटलेले नाहीत. महसूल विभागाला दिलेले धनादेशही वटले नसल्याने शासनाची फसवणूक झाल्याचा आरोप करीत पाटील यांनी दोन दिवस उपोषण केले होते. त्या वेळी खालापूर तहसीलदारांनी योग्य कारवाईचे आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले होते. त्यानंतरही कारवाई होत नसल्याने माजी आमदार सुरेश लाड यांनी मंगळवारी तहसीलदारांची भेट घेऊन चर्चा केली. या वेळी उपोषणकर्ते भूषण पाटील आणि शेतकरी उपस्थित होते. तहसीलदार तांबोळी यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क करून योग्य मार्ग काढण्याचा शब्द दिला आहे.

न्याय मिळावा यासाठी गेले अनेक दिवस शेतकरी लढा देत आहेत. २३ डिसेंबरपर्यंत त्यांना न्याय मिळाला नाही, तर शेतकऱ्यांसोबत आत्मदहन करण्याचा इशारा माजी आमदार सुरेश लाड यांनी या वेळी दिला. जिल्हा परिषद सदस्य नरेश पाटील, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष शेखर पिंगळे यांच्यासह कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

दरम्यान, या प्रकरणाने भविष्यात राष्ट्रवादी आणि शिवसेना यांच्यात संघर्ष पेटण्याची शक्यता आहे.

# रायगड जिल्ह्यात दर शनिवारी भरणार दप्तराविना शाळा

## जि. प. प्रशासनाचा उपक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी जिल्ह्यात दर शनिवारी दप्तराविना शाळा हा विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. शनिवारी शाळेत दप्तर न आणता विविध कार्यक्रम राबविता येणे शक्य आहे. त्यानुसार मार्च २०२२पर्यंत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा शिक्षण सभापती सुधाकर घारे व शिक्षण अधिकारी जोत्स्ना शिंदे–पवार यांनी दिली.

कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या कालावधीकरिता शाळा बंद होत्या. सध्या कोरोना प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर औपचारिक व अनौपचारिक पद्धतीने विद्यार्थी शाळेत येत असले तरी ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने शिक्षण सुरू आहे. तरीसुद्धा विद्यार्थ्यांच्या सर्वागिण विकासासाठी मर्यादा येत होत्या. ती उणिव भरून काढणे व सतत विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात सामावून घेणे आवश्यक असून, १ डिसेंबरपासून शाळा सुरू होत आहेत.

विद्यार्थ्यांना अभ्यासाचे ओझे न वाटता शिकण्यासाठी स्वयंप्रेरित करणे गरजेचे आहे. त्याकरिता प्रत्येक शनिवारी शाळेत दप्तर न आणता विविध कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. मार्च २०१२पर्यंत जे उपक्रम राबवायचे आहेत त्याचे नियोजन करण्यात आले आहे.

## दप्तराविना शाळा उपक्रम नियोजन

| दिनांक | उपक्रमाचे नाव |
|---|---|
| ४/१२/२०२१ | उमलत्या कळ्या |
| ११/१२/२०२१ | चला करूया श्रमदान |
| १८/१२/२०२१ | माझी परसबाग |
| २५/१२/२०२१ | फिट इंडिया |
| १/१/२०२२ | माझा अभिमान |
| ८/१/२०२२ | मला समजले |
| १५/१/२०२२ | मला सांगायचंय |
| २२/१/२०२२ | चला पाहूया बोलक्या भिंती |
| २९/१/२०२२ | मला सांगायचंय |
| ५/२/२०२२ | माझा गाव माझा विकास |
| १२/२/२०२२ | ओळख माहिती तंत्रज्ञानाची |
| १८/२/२०२२ | माझा राजा छत्रपती शिवाजी महाराज |
| २६/२/२०२२ | सर्वांसंगे हात धरू, सर्वांसंगे साथ चालू, राष्ट्रीय एकात्मता |
| ५/३/२०२२ | माझ्या ताईचा मला अभिमान महिला सक्षमीकरण |
| १२/३/२०२२ | माझी वसुंधरा |
| १९/३/२०२२ | जाणू मोल पाण्याचे, काम करू पुनर्भरणाचे |
| २६/३/२०२२ | करूया प्रसार आणि प्रचार व्यसनमुक्तीचा |


## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थांचा सन २०२१ ते २०२६ या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यात येत आहे. संस्थांची नावे – १. इंडिया बुल्स ग्रीन्स ॲस्टर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. कोन, २. कांचन महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या, कामोठे ३. दि पिपल्स नागरी सहकारी पतसंस्था मर्या, कळंबोली, सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. ०३–१२–२०२१ ते ०९–१२–२०२१. नामनिर्देशन पत्र छानणी दि. १०–१२–२०२१, नामनिर्देशन माघारी दि.१३–१२–२०२१ ते २७–१२–२०२१ व आवश्यकतेनुसार मतदान दि. ०२–०१–२०२२ रोजी घेण्यात येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सूचना व अधिक माहिती संस्थेचे कार्यालयात व तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, पनवेल, सुशिला निवास, मिडलक्लास हौसिंग सोसा. पनवेल यांचे कार्यालयात पहावयास मिळेल. तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

| सही/– | सही/– | सही/– |
|---|---|---|
| (बालाजी वाघमारे) | (परेश कर्णेकर) | (संजय पाटील) |
| निवडणूक निर्णय अधिकारी | निवडणूक निर्णय अधिकारी | निवडणूक निर्णय अधिकारी |

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वर्णन केलेली शेती मिळकत त्या मिळकतसमोर लिहीलेल्या मालक/कब्जेदार कडून आमचे अशिल श्री. नंदकुमार चंद्रकांत म्हात्रे, रा. खुटारी पो. तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड. विकत घेणार आहेत सदर मालक/कब्जेदार आमचे अशिलांचे सोबत रजिस्टर्ड खरेदीखत करणार आहेत. सदर शेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे–वाकसाई, ता. मावळ, जि. पुणे**

| मालक/कब्जेदाराचे नांव | गट क्रमांक | व उपविभाग | भुधारणा पध्दती | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १) गुलशन सैफूदिदन मर्चंट, २) निश्रीन सैफद्दिन मर्चंट, ३) समीना सैफुद्दिन मर्चंट, ४) लुबईना सैफद्दिन मर्चंट सर्व रा. ५०३, पाचवा मजला, ए विंग, सिल्व्हर पॅलेस, पी माला रोड, समोर बांद्रा पश्चिम, मुंबई ४०००५० | १३९ | १ | १ | ०–२२–४० पो.ख. ०–१८–०० एकूण ०–४०–४० | १.६३ |

वरील पुर्ण क्षेत्र ०–४०–४० हे.आर.पॉ. गुंठे एवढे क्षेत्र मिळकतीचा विक्री व्यवहार

वर नमुद केलेल्या शेती मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तिच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसीत करणेबाबतचा करार कुलहक्क, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती. त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १० दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर शेती मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक/कब्जेदाराबरोबर ठरविलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व खरेदीखत रजिस्टर्ड करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण – पनवेल
दिनांक – ३०/११/२०२१

**सही**
**श्री. प्रफुल्ल विठोबा म्हात्रे**
ॲडव्होकेट हायकोर्ट व नोटरी (भारत सरकार)
पत्ता :– ११, केशव वसंत, जुने तहसील कार्यालयासमोर, पनवेल, ता. पनवेल जि. रायगड.

सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना
### (हक्कसोड पत्राबाबत)

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यांत येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरीता संपादित होणाऱ्या खालीलप्रमाणे नमूद जमिनीच्या साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप करण्यांत आलेली आहे.

| अ. क्र. | युनिट निवाडा क्र. | सर्व्हे हिस्सा क्रमांक | संपादित क्षेत्र | भूधारकांचे नांव | क्षेत्र चौ.मिटर |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९३ | ३३/२ | ०–७०–५ | १. श्री. धोंडु धर्मा गायकवाड २. श्रीमती महादुबाई उर्फ आनंदीबाई मारुती पाटील ३. श्रीमती सीताबाई राम म्हात्रे | ११२० चौ.मी. |

तसेच सदर ११२० चौ.मी. क्षेत्रान्वये दि. २४.१२.२०१४ रोजीच्या संगणकीय सोडतीमध्ये भूखंड क्रमांक १०४, सेक्टर–७, हा भूखंड पुष्पकनगर पारगांव डुंगी येथे वाटपित करण्यांत आलेला आहे

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिचे नाव |
|---|---|
| १. श्रीमती महादुबाई उर्फ आनंदीबाई मारुती पाटील २. श्रीमती सीताबाई राम म्हात्रे | १. श्री. धोंडु धर्मा गायकवाड |

उपरोक्त दाव्यामधील (हक्कसोड) नुसार सिडकोकडून केवळ खालील व्यक्तीच्या नावाची नोंद भाडेपट्टेदार म्हणून घेण्यात येईल.

**१. श्री. धोंडु धर्मा गायकवाड**

उपरोक्त हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी करारनामा करण्यांत आलेल्या भूखंडामधील हक्क हितसंबंध सोडून दिलेले आहेत त्याची नावे वगळून जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा व्यक्तीच्या नावे सिडकोकडून नोंद घेण्यात येईल. आजच्या तारखेपासून ३० दिवसांपर्यंत कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

वरील भाडेपट्टा करारनामा करण्यांत आलेल्या भूखंडा संदर्भात वर नमूद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभांत हक्क व अधिकार प्रदान करण्यांत आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार यापुढे साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करुन सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह **अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि) तळ मजला, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई,** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर याजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यांत यणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील भाडेपट्टा करारनामा करण्यांत आलेल्या भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अति.मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (विमानतळ)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/३२२/२०२१–२२

# टेनिस क्रिकेटचाही वर्ल्डकप झाला पाहिजे

## विनोद कांबळीचे मत

**डोंबिवली : प्रतिनिधी**

स्पर्धा कोणतीही असो त्यात भाग घेणे महत्त्वाचे असते. टेनिस बॉल क्रिकेटमध्येही उज्ज्वल असे भविष्य आहे. त्यामुळे वर्ल्ड कप टेनिस क्रिकेट स्पर्धा व्हावी ही इच्छा असून खेळाडूच त्याला पुढे नेऊ शकतात, असे मत भारताचा माजी क्रिकेटपटू विनोद कांबळी याने व्यक्त केले.

ठाणे जिल्ह्यातील दिवा येथील खार्डी गावात गावदेवी क्रिकेट संघ व ग्रामस्थ मंडळातर्फे खार्डी चषक २०२१चे तसेच स्व. रतनबुवा पाटील स्मृतिचषक यांच्या वतीने नॅशनल ब्लास्ट चॅम्पियनशिपचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या उद्घाटनाला माजी खेळाडू विनोद कांबळी दिवा येथे आला होता. त्या वेळी तो बोलत होता. १४ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या या क्रिकेट स्पर्धेत ग्रामीण भागातील ४८ संघ सहभागी होणार आहेत. या वेळी




आयोजक दिनेश पाटील, अरुण जांभळे, शरद पाटील आदी उपस्थित होते.

विनोद कांबळी म्हणाला, मीसुद्धा टेनिस बॉलने क्रिकेट खेळायला सुरुवात केली आणि खेळता खेळता भारतीय संघासाठी खेळून गेलो. टेनिस क्रिकेटमध्ये आज माझ्या भावांसमोर मी काहीच नाही आहे. त्यामुळे भारतात टेनिस बॉलचे आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रिकेट सामने झाले पाहिजेत. त्यातून ग्रामीण भागातील खेळाडूंना देश पातळीवर खेळायची संधी मिळेल. ग्रामीण भागातून आता चांगले खेळाडू पुढे येत आहेत. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठीच मी आज येथे आलो असून येथील एखाद्या सामन्यात खेळायची मलादेखील संधी द्यावी, मी येथे पुन्हा येणार आहे.

आचरेकर सरांच्या आठवणी सांगताना कांबळीने पतंग उडविण्याचा किस्सा सर्वांना सांगितला. क्रिकेट खेळत असताना कट झालेला पतंग माझ्यासमोर आला आणि मी बॉलरला थांबण्यास सांगून तो पतंग उडवत होतो. सचिनने सरांना ते सांगितले आणि सरांनी लिहून घेतले की विनोद कांबळी पतंग उडवित आहे. सरांनी त्या वेळी कानाखालीदेखील मारली असल्याचे त्याने सांगितले.

## एटीपी चॅलेंजर टेनिस स्पर्धेत भारताचा रामनाथन अजिंक्य

**मनामा (बहारीन) : वृत्तसंस्था**


भारताच्या रामकुमार रामनाथनने एटीपी चॅलेंजर टेनिस स्पर्धेचे पहिलेवहिले जेतेपद पटकावले. त्याला या जेतेपदासाठी कारकीर्दीत तब्बल १२ वर्षे वाट पाहावी लागली.

सहाव्या मानांकित रामकुमारने मनामा येथे झालेल्या स्पर्धेतील (एटीपी ८० दर्जा) एकेरीच्या अंतिम सामन्यात रशियाच्या एव्हग्नी कार्लोव्स्कीला ६-१, ६-४ अशी धूळ चारली. त्याला याआधी कारकीर्दीत सहा वेळा चॅलेंजर स्पर्धांच्या उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. २७ वर्षीय रामकुमारने मनामा येथे झालेल्या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात उत्कृष्ट खेळ केला.

## आरोग्य प्रहर

### रात्री शांत झोप लागण्यासाठी...

रात्रीची झोप कशी गाढ आणि शांत लागायला हवी. झोप छान झाली की पुढचा दिवस मस्त फ्रेश जातो, पण नीट झोपच झाली नाही की मात्र दिवसाचं सगळं गणित बिघडून जातं. उत्तम आरोग्यासाठी सहा ते आठ तासांच्या झोपेची आवश्यकता असते. पडल्या पडल्या शांत आणि गाढ झोप लागायची असेल तर हे उपाय नक्की करुन पाहा...



**झोपण्यापूर्वी मालिश करा**

दिवसभराच्या थकव्याने शरीराला ज्या ठिकाणी ताण पडला आहे त्या ठिकाणी तेलाने हळूवार मालिश करा. संपूर्ण अंगाला मालिश केले तर उत्तमच, पण ते शक्य नसेल तर किमान ताण आल्यासारखे वाटत आहे तिथे आवर्जून मालिश करा. हे मालिश कोमट तेलाने केल्यास आणखी उत्तम. डोक्याला आणि खांद्यांना कोमट केलेले तीळाचे तेल रात्री झोपताना आवर्जून लावा. त्यामुळे तुमचा थकवा काही प्रमाणात दूर होऊन शांत झोप लागेल.

**झोपण्यापूर्वी पाय स्वच्छ धुवा**

पूर्वीच्या काळी झोपण्यापूर्वी पाय धुवून झोपायची पद्धत होती. त्याला शास्त्रीय कारण होते. पाय धुतल्याने वेगवेगळ्या कारणांनी आलेली नकारात्मकता दूर होते आणि नकळत फ्रेश वाटते. मुख्यत: पाय धुतल्याने शरीराला व ताण आलेल्या पेशींना आराम मिळायला मदत होईल. हे पाय कोमट पाण्याने धुतले तर आणखी चांगले. धुतल्यानंतर त्यांना नीट कोरडे करून झोपताना थोडेसे तेल घेऊन तळव्यांना मालिश करा. हाताने पायाची बोटे, तळवे, टाचा छान हळूवार चोळा. त्यामुळे पायाचा शीण निघून जाईल आणि गाढ झोप लागायला मदत होईल.

**प्राणायाम करा**

दिवसभर आपण वेगवेगळ्या गोष्टींसाठी धावत असतो. त्यामुळे शारीरिक आणि मानसिक थकवा येतो, पण मन आणि शरीराला थोड्या शांतीची, विश्रांतीची गरज असते. प्राणायाम केल्याने मन आणि शरीर शांत व्हायला मदत होते. डोळे मिटून शांत बसा आणि श्वासावर लक्ष केंद्रित करा. यामुळे तुमच्या शरीरातील रक्तप्रवाह सुधारण्यास मदत होईल आणि शरीरातील ऑक्सिजनची पातळी वाढण्यास मदत होईल. यामुळे डोके शांत होऊन चांगली झोप येण्यास मदत होईल.

**इलेक्ट्रॉनिक उपकरणांपासून दूर राहा**

रात्री सगळी कामे आवरून बेडवर पडल्यानंतर अनेकांना टीव्ही पाहणे, मोबाईल किंवा टॅबलेट पाहणे याची सवय असते, मात्र रात्रीच्या वेळी इलेक्ट्रॉनिक उपकरणांपासून दूर राहाणे केव्हाही चांगले. असे केल्यास शांत आणि गाढ झोप येऊ शकते.



## ‘वानखेडे’वर प्रेक्षकांना फक्त दोन हजार तिकिटे

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत-न्यूझीलंड यांच्यात मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणाऱ्या दुसऱ्या कसोटीसाठी सर्वसामान्य चाहत्यांच्या वाट्याला दोन हजार तिकिटेच येणार आहेत, अशी माहिती मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या (एमसीए) विश्वसनीय सूत्रांनी दिली.

कोरोना साथीच्या पाश्र्वभूमीवर घालण्यात आलेल्या नियमांमुळे ३ डिसेंबरपासून होणाऱ्या या सामन्यासाठी स्टेडियमच्या एकूण प्रेक्षक क्षमतेपैकी २५ टक्के प्रेक्षकांनाच प्रवेश देण्यात येणार आहे. वानखेडेची प्रेक्षक क्षमता ३३ हजार इतकी आहे, मात्र शासनाच्या नियमांनुसार ८,५०० तिकिटेच प्रत्यक्षात उपलब्ध असतील.

## राष्ट्रीय पॅरा कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाची निवड

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

राज्यस्थानमधील अजमेर येथे होणाऱ्या राष्ट्रीय दिव्यांग (पॅरा) कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाची निवड करण्यात आली आहे. रायगडचा रमेश संकपाळ या संघाचे नेतृत्व करेल.

महाराष्ट्र पॅरा कबड्डी संघाची निवड करण्यासाठी कुलाबा दिव्यांग क्रीडा असोसिएशन महाराष्ट्र आणि सहकार्य अपंग कल्याणकारी संस्था रायगड यांच्यामार्फत खालापूर तालुक्यातील चौक फाटा वावंढळवाडी येथे दोन सत्रात शिबिर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये महाराष्ट्रातील ३० खेळाडूंनी सहभाग घेतला.



या शिबिरातून रमेश संकपाळ (कर्जत-रायगड), मंगेश म्हात्रे (पेण-रायगड), ओमकार महाडिक (महाड-रायगड), अक्षय निकम (रोहा-रायगड), राजा मोकल (पेण-रायगड), मुकुल खाडे (पेण-रायगड), राजन भरताव (मुंबई), रायसिंग वसावे, महेश वसावे व विजय वळवी (नंदूरबार), आसिफ शेख व ज्योतिराम कदम (सांगली) यांची राज्यस्थानच्या अजमेर येथे २७ ते २९ डिसेंबर रोजी होणाऱ्या राष्ट्रीय पॅरा कबड्डी स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.

रमेश संकपाळ याची कर्णधार, मंगेश म्हात्रे यांची प्रशिक्षककम खेळाडू, कुलाबा दिव्यांग क्रिडा असोसिएशन महाराष्ट्र व सहकार्य अपंग कल्याणकारी संस्था रायगडचे सचिव शिवाजी पाटील यांची संघ व्यवस्थापक व संकल्प अपंग संघ मुंबईचे अध्यक्ष बाबाराव धोत्रे यांची सहाय्यक म्हणून निवड करण्यात आली आहे.

शिबिर यशस्वी करण्यासाठी कुलाबा दिव्यांग क्रिडा असोसिएशन तथा सहकार्य अपंग कल्याणकारी संस्था रोहाचे सचिव शिवाजी पाटील, कुलाबा असोसिएशनचे अध्यक्ष शशांक हिरवे, रायगड जिल्हाध्यक्ष कल्पेश तवले, फिजिओथेपिस्ट व सहव्यवस्थापक सुनील पाटील, खालापूर तालुक्यातील दिव्यांग सामाजिक कार्यकर्ते मंगेश पार्टे, निवड समिती सदस्य रमेश संकपाळ, मंगेश म्हात्रे तसेच ज्यांनी मैदान उपलब्ध करून दिले असे रामदास काईनकर व रवी काईनकर यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.



## पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत कुणाल विचारेला रौप्यपदक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

नेरूळ येथील डी. वाय. पाटील कॉलेजमध्ये व्दितीय वर्षात शिकणाऱ्या कुणाल संदीप विचारे याने हैदराबाद येथे झालेल्या पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करीत रौप्यपदक पटकाविले आहे.

कुणालने सब ज्युनिअर गटात रौप्यपदकाला गवसणी घातली. रसायनी-पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील रिलायन्स कंपनीचे व्यवस्थापन पदाधिकारी संतोष विचारे यांचा कुणाला हा पुतण्या आहे. या यशाबद्दल कुणालचे अभिनंदन होत आहे.

## द्रविडने केला रहाणेचा बचाव

**कानपूर : वृत्तसंस्था**

कानपूर कसोटी सामना अनिर्णीत राहिला. या कसोटीत विराट कोहलीच्या अनुपस्थितीत संघाचे नेतृत्व करीत असलेल्या अजिंक्य रहाणेला पुन्हा एकदा मोठी खेळी खेळण्यात अपयश आले, मात्र प्रशिक्षक राहुल द्रविडने रहाणेचा बचाव करत तो लवकरच फॉर्ममध्ये परतणार येईल, असे सांगत त्याची पाठराखण केली.



कानपूर कसोटीत फ्लॉप ठरल्यानंतर आणि विराट कोहली दुसऱ्या कसोटीसाठी संघात आल्यानंतर अजिंक्य रहाणेला मुंबई कसोटीत स्थान मिळेल का या प्रश्नावर द्रविडने आपले मत मांडले. सामना संपल्यानंतर व्हर्च्युअल पत्रकार परिषदेत द्रविडला जेव्हा रहाणेचा सध्याचा फॉर्म संघाची चिंता वाढवणार आहे का, असे विचारण्यात आले तेव्हा तो म्हणाला यासाठी फार काळजी करण्याची गरज नाही. साहजिकच अजिंक्यने तुमच्यासाठी जास्त धावा केल्या पाहिजेत, त्यालाही तेच हवे आहे.

## द्रविडकडून ग्राउंड्समनला रोख बक्षीस

**कानपूर : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा प्रशिक्षक राहुल द्रविडने न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामना संपल्यानंतर कानपूरच्या ग्रीन पार्क स्टेडियमच्या ग्राउंड्समनला ३५ हजार रुपये दिले. सामन्याच्या पाचही दिवशी खेळपट्टी चांगली राहिल्याने द्रविडने ग्राउंड्समनला ही रक्कम देत सर्वांची मने जिंकली.



सामन्याच्या पाचव्या व शेवटच्या दिवशी न्यूझीलंडच्या फलंदाजांनी ९४ षटके फलंदाजी केली आणि फक्त आठ विकेट गमावल्या. शेवटच्या दिवशी भारतीय संघाला सामना जिंकण्यासाठी नऊ विकेट्सची गरज होती. भारताकडे आर अश्विन, रवींद्र जडेजा आणि अक्षर पटेल यांच्या रूपाने फिरकी त्रिकूट होते, मात्र त्यांना केवळ आठ विकेट घेता आल्या. अशा प्रकारे दोन सामन्यांची मालिका सध्या ०-० अशा बरोबरीत आहे.

सामना संपल्यानंतर यूपी क्रिकेट असोसिएशनने याबाबत माहिती दिली. राहुल द्रविडने वैयक्तिकरित्या आमच्या ग्राउंड्समनला ३५ हजार रुपये दिले आहेत, असे त्यांनी सांगितले. या सामन्यात टीम इंडियाच्या गोलंदाजांनी १९ विकेट घेतल्या. दुसरीकडे न्यूझीलंडच्या गोलंदाजांनी १७ विकेट घेतल्या. या सामन्यात फलंदाज आणि गोलंदाज दोघांचे वर्चस्व होते. प्रशिक्षक म्हणून द्रविडची ही पहिलीच कसोटी मालिका आहे.

या मालिकेतील अंतिम सामना ३ डिसेंबरपासून होणार आहे. या सामन्यातून कर्णधार विराट कोहली पुनरागमन करीत आहे. तो टी-२० मालिकेतही खेळला नव्हता. त्यामुळे संघाच्या प्लेइंग-११मध्ये बदल निश्चित आहे.

## माणगाव प्रीमियर लीगचा आजपासून ‘रन’संग्राम



**माणगाव : प्रतिनिधी**

क्रिकेटचा ‘रन’संग्राम माणगाव प्रीमियर लीग २०२१ स्पर्धेला बुधवार (दि. १)पासून सुरुवात होत असून ही स्पर्धा ५ डिसेंबरपर्यंत माणगाव-मोर्बा रोड मार्गावरील अल्ताफ धनसे यांच्या मैदानावर रंगणार आहे.

या वेळी लीगचे संस्थापक ॲड. राजीव साबळे, कार्याध्यक्ष संजयआप्पा ढवळे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. स्पर्धेत प्रथम पारितोषिक ५५,५५५ रुपये, द्वितीय ३३,३३३ रुपये, तृतीय व चतुर्थ प्रत्येकी २२,२२२ रुपये आहे. याशिवाय उत्कृष्ट खेळ करणाऱ्या खेळाडूंनाही आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत.

माणगाव प्रीमियर लीगचे हे पहिले पर्व असून क्रिकेटच्या या थराराचा मनमुराद आनंद क्रिकेटप्रेमींनी घ्यावा, असे आवाहन निमंत्रक तथा अध्यक्ष मंगू जाधव व सहकाऱ्यांनी केले आहे.

## टेनिस चॅम्पियनशीपमध्ये ओम वर्मा उपविजेता




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्तीसगडमधील रायपूर येथे झालेल्या ऑल इंडिया अंडर-१७ टेनिस चॅम्पियनशीप स्पर्धेत महाराष्ट्राचा ओम वर्मा उपविजेता ठरला.

युनियन क्लबमध्ये खेळल्या गेल्या उपांत्य फेरीच्या लढतीत ओम वर्माने छत्तीसगडच्या कुशाग्र जगवानीला ९-४, ६-३ अशी मात दिली होती, तर दुसऱ्या सामन्यात इमोन भट्टला ६-३, ६-४ने पराभूत केले. याशिवाय दुहेरीतही ओम वर्माने सहकाऱ्यासोबत सेमिफायनलमध्ये धडक दिली होती.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com